
# महाराष्ट्राचे नाथ : संत एकनाथ

– गजानन कुलकर्णी
रत्नागिरी.



दौलताबादमध्ये जनार्दनपंत नावाचा एक साधू माणूस होता. सगळे त्यांना पंत म्हणत. जनार्दनपंतांच्या संतपणाची किर्ती चंदनाच्या सुगंधाप्रमाणे साऱ्या पंचक्रोशीत दरवळली होती. पण सरोवरातल्या कमलपत्राप्रमाणे या साऱ्या लौकिक भावनांतून जनार्दनपंत कोरडे होते. निरभिमानी झाले होते. संतपदाला पोचून निर्मोही, निरासक्त बनले होते.

एका सकाळी उठून, स्नानसंध्या करून जनार्दनपंत अंगणात उभे होते, इतक्यांत एक तेज:पुंज' दिसणारा कुमार त्यांच्या पुढ्यात येऊन उभा राहीला. हात जोडून त्यांना म्हणाला, ''पंत आपली कीर्ती ऐकून मी आपल्या दर्शनाला आलो आहे. मी आश्वलायन शाखेचा, ऋग्वेदी ब्राह्मण आहे. गोदातटी माझ वास्तव असतं. माझा जन्म भानुदास वंशात झाला. भानुदासांनी म्हणजे माझ्या पणजोबांनी साक्षात् पांडुरंगाला सखा बनवलं नि त्या वैकुंठनाथाला अनागोंदीहून पुन्हां पंढरीला माघारी आणलं. त्या भानुदासाचा मी पणतू.

माझ्या वडिलांचं नाव सूर्यनारायण नि मातेचं रुक्मिणी. आमच्या घरातले सर्व भजन-पूजनात दंग असतात. तरीही मला या संसाराची विलक्षण भीती वाटते. आपलं कसं होईल याची काळजी वाटते. म्हणूनच एव्हढ्या दूरवर आपली कीर्ती ऐकून आलो आहे. आपण मला कृपाकर व्हा; आणि माझ्या दु:खाचा

परिहार करा.

त्या एवढ्याशा कुमाराचे शब्द ऐकून जनार्दनपंतांना कौतुक वाटलं. त्यांनी त्या मुलाला छातीशी कवटाळलं. प्रेमानं थोपटलं नि सांगितलं, ''तुझी जर एवढी तीव्र इच्छा असेल, तर माझ्याजवळ राहा. तुला मी सारं शिकवीन.''

जनार्दनपंतांनी एवढं म्हणताच तो मुलगा खूष झाला व त्या दिवसापासून त्यांच्याकडेच राहू लागला. जनार्दनपंतांच्या घरातील सर्व कामं मनापासून करू लागला. शेणसडा घालून सारवण्यापासून ते अगदी गंध उगाळून देऊन पूजेची तयारी करून देण्यापर्यंत सारं तोच करी. हसतमुखानं, चपळाईनं लीनवृत्तीने सेवा करीत जनार्दनपंतांच्या साऱ्या सवयी, सारे नियम एकनाथ मोठ्या काटेकोरपणानं पाळीत असत.

## नाथांची तत्परता – गुरूभक्ती

जनार्दनपंतांना विडा खाण्याची सवय होती. दरबारात कामकाज सुरु असतानाही अधुनमधून त्यांना तो लागत असे. अशावेळी विडा करून द्यायला, पिकपात्र धरायला एकनाथच मोठ्या तत्परतेने पुढे होत असे. त्यांचा विडा लावून देत असे. पिकपात्र धरीत असे. जनार्दनपंतांची कुठलीही गोष्ट करताना एकनाथाला मनस्वी आनंद होत असे.

एकदा दरबारात असेच जनार्दनपंत काम करत होते. तोंडात विडा होताच तो थुंकायला त्यांनी पिकपात्र मागितलं, काही कारणानं पिकपात्र जाग्यावर नव्हतं. गुरूचा खोळंबा होईल, गुरूला त्रास होईल या विचारात एकनाथ अस्वस्थ झाला. त्यानं मागचा पुढचा विचार न करता थुंकण्यासाठी आपल्या हाताची ओंजळ जनार्दपंतांच्या तोंडासमोर धरली आणि पंतांनी थुंकलेला विडा एकनाथानं अमृतप्रसाद म्हणून ग्रहण केला. त्याचं हे कृत्य दरबारातले लोक थक्क होऊन पहात होते.

हे कांहीच नाही, असा प्रकार कांही दिवसांनी घडला. दरबारात महत्वाचे कामकाज सुरू होतं, तुडुंब गर्दी होती, मुंगी शिरायलाही जागा नव्हती. पान खाऊन खाऊन आणि पिक टाकून पिकपात्र पूर्ण भरलं होतं. तोंडात चघळत असलेला विडा जनार्दनपंतांना थुंकायचा होता. त्यांनी पाहिलं तर पिकपात्र भरलेलं होतं. पंतांनी एकनाथाला हाक मारली आणि सांगितलं, ''मुला, जा. लवकर पात्र साफसूफ करून आण, मला थुंकायचं आहे.''

गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून पिकपात्र घेऊन एकनाथ उठला. पण दरबारात इतकी खचाखच गर्दी होती की त्याला पात्र साफ करायला बाहेर जाता येईना. तो विचारात पडला. काय करावं ? त्याला सुचेना. भांबावल्यासारखा एक क्षण तो उभा राहीला. दुसऱ्याच क्षणी त्यानं ते भरलेले पिकपात्र तोंडाला लावलं आणि चाटून पुसून साफ केलं.

दरबारातले सगळे लोक थक्क होऊन पहात होते. त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नव्हता. पात्र साफसूफ करून एकनाथानं ते जनार्दनपंतांच्या पुढ्यात आणून ठेवलं. ते साफसूफ पात्र बघून पंतांनाही आश्चर्य वाटलं. त्यांनी त्याला विचारलं, ''एकनाथा, कुठं जाऊन तू हे पात्र साफ करून आणलस ?''

एकनाथ ह्या प्रश्नानं चपापला; घाबरला. काकुळतीला येऊन गुरूला म्हणाला, ''पंत, हे पात्र मी धुतलं नाही. साफ केलं, त्यातली सगळी पिंक मी खाल्ली आणि चाटून पुसून साफ केली. कारण भरलेलं पात्र बाहेर टाकायला जायला अजिबात जागाच नव्हती –'' ''नाथा, तुला ती पिंक प्राशन करताना घाण नाही वाटली ?'' पंतांनी आश्चर्याने विचारले. पंतांच्या ह्या प्रश्नाला नाथांनी अतिविनयाने उत्तर देत म्हटलं, ''नाही. गुरूराया आपलं उष्ट प्राशन करताना कसली घाण ? मला तर ते पियुषच वाटलं.''

त्याची ही वृत्ती पाहून जनार्दनपंतांनी त्याला पोटाशी धरलं, त्याचं कौतुक केलं नि त्याला वरची हलकी सलकी कामं न सांगता, हिशेब-ठिशेब लिहिण्याची, दरबारी कामकाजात लक्ष घालण्याची कामं सांगितली. ती कामंही एकनाथ अतिशय तल्लख बुद्धीनं करू लागला. जनार्दनपंतांच्या कामाचा भार हलका करू लागला. एकनाथ, जनार्दनपंतांचा उजवा हात बनला. पंतांना कामातून सवड मिळू लागली. भजन-पूजनात जास्तीत जास्त रस घेता येऊ लागला. समाधीत बराच काळ मग्न राहता येऊ लागलं. सगळं दरबारी कामकाज आता एकटा एकनाथ पाहू लागला होता.

## एकनाथ युद्धभूमीवर

आता पंतांवाचून कुठं कांहीही अडत नसे; सगळे व्यवहार एकनाथ अगदी चोख पार पाडत असे, एक दिवस मात्र सत्त्वपरिक्षेची वेळ आली. दरबारातून जासूद लखोटा घेऊन आला. लखोट्यात, जनार्दनपंतांना ताबडतोब युद्धासाठी रणांगणावर हजर राहायचं फर्मान होतं. मोंगलावर परचक्र आलं होतं. ती बातमी एकनाथानं वाचली. कुठल्याही परिस्थितीत ही खबर गुरूला द्यायला हवी होती. पण गुरू तर समाधीत दंग झालेले, काय करावं ? ही खबर गुरूंना कशी द्यावी ? खबर देण्यासाठी गुरूंच्या समाधीचा भंग करायला हवा होता, काय करावं हे एकनाथाला सुचेना. गुरूंच्या ध्यानधारणेत त्याला व्यत्यय आणवेना. त्यानं मनाशी कसला तरी निश्चय केला नि जनार्दनपंतांचा युद्धावर जायचा पोषाख त्याने आपल्या अंगावर

चढवला. लांबूनच गुरूचरणांना वंदन करून, गुरूनामाचा जप करीत, एकनाथ शस्त्रास्त्र धारण करून युद्धभूमीवर आला.

सारं वातावरण युद्धानं पेटलं होतं. तुंबळ युद्ध सुरू झालं होतं. एकनाथ आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देत होता. उत्तेजन देत होता. वीराला साजेशा वृत्तीने एकनाथ लढत होता. अटीतटीची लढाई होऊन, मोंगलांच्या गळ्यात विजयश्रीने माळ घातली. सारं श्रेय बादशहानं जनार्दनपंतांना दिलं. जनार्दनपंतांच्या वेषातल्या एकनाथांना कंठा शेला देऊन सत्कार केला. पालखीचं मानकरी केलं.

बादशहाकडून सगळा आदरसत्कार स्विकारून एकनाथ घरी आले. सर्व सन्मान गुरूचरणी अर्पण करून, नेहमीच्याच वृत्तीनं ते घरी वावरू लागले. यातलं कांहीच त्यांनी आपल्या गुरूला सांगितलं नाही.

इकडे समाधी उतरल्यानंतर, आपली सर्व कामं उरकून जनार्दनपंत दरबारात गेले. जनार्दनपंत दरबारात जातात न जातात तोच स्वत: बादशहा त्यांच्या स्वागताला पुढं आला. त्यानं जनार्दनपंतांना बसायला आसन दिलं, युद्धात त्यांनी मिळवून दिलेल्या यशाबद्दल पुन्हा वारेमाप स्तुती केली.

आश्चर्यचकित होऊन जनार्दनपंत हे सारं ऐकत होते, अंतर्ज्ञानानं त्यांनी ताडलं की आपण समाधी लावून ध्यानस्थ बसलो होतो, तेव्हां हे सारं कौशल्य एकनाथानं दाखवलं, त्यांना मनोमन कौतुक वाटलं. त्यांचा ऊर भरून आला. ते झपाझप घरी आले. घरी एकनाथ आपल्या नित्यनैमित्यिक कामांत मग्न होता. कांही झालच नाही अशा निर्विकार वृत्तीत वागत होता. गुरूची सेवा करत होता. जरासासुद्धा अहंकाराचा वारा त्याच्या मनाला शिवला नव्हता. जनार्दनपंतांना असा शिष्य मिळाल्यानं धन्य झाल्यासारखं वाटत होतं.

जनार्दनपंतांनी न राहून एकनाथाला बोलावलं आणि विचारलं, ''नाथा तूं माझ्याशी लबाडी केलीस, खोटं बोललास, कांही गोष्टी माझ्यापासून लपवल्यास.'' गुरूचं हे वाक्य ऐकताच हातातलं काम टाकून एकनाथ पुढं धावला. त्यानं जनार्दनपंतांचे पाय धरले नि कळवळून तो म्हणाला.

''पंत, मी आपला शतश: अपराधी आहे. जे काय केलं त्याबद्दल मला क्षमा करा. बादशहाच्या हुकूमाची तामिली करण्यासाठीच केवळ मी युद्धावर गेलो, आपल्या कृपेने त्यातून निभावून गेलो. मला क्षमा करा.''

''नाही. नाथा तुला क्षमा नाही. शिक्षा करणार आहे मी. श्री दत्तात्रेयांचे दर्शन घडवणार आहे मी तुला.''

हे वाक्य ऐकून मात्र एकनाथाचा चेहरा आनंदानं फुलला, त्याच्या तपश्चर्येला फळ आलं होतं.

## एकनाथाची सत्वपरिक्षा

जनार्दनपंत त्यानंतर एकनाथावर विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या टाकू लागले. कौमार्यावस्था संपवून तारुण्यांत प्रवेश केलेला एकनाथ ती सर्व कामे अगदी सहजतेने करीत होता. एकनाथाचं वागणही मोठं विशुद्ध होतं. पवित्र होतं. तारुण्यानं मुसमुसलेलं आरोग्यसंपन्न असं त्याचं शरीर कित्येकांना वेड लावीत असे; पण एकनाथ वासनेपासून दूर होता. अध्यात्म-साधनेत दंग होता.

अशातच त्या नगरात एक आश्चर्य घडलं. त्या नगरात एका ब्राह्मणाच्या घरी त्याची विधवा मुलगी राहात होती. अतिशय लावण्यसंपन्न, तारुण्यानं मुसमुसलेली. साक्षात रंभा उर्वशीच. नवरा लहान वयातच गेल्यानं तिच्या वासना अतिशय जागृत होत्या; तेजाळ होत्या. त्यामुळेच घरातले उत्तम संस्कार असूनही तिच्या हातून दुराचरण घडलं. ती आपल्या जाराकडं जाऊन आपल्या वासना भागवू लागली.

त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिला दिवस गेले, दिसामासानं तिचं पोट वाढू लागलं. लोकात चर्चा सुरू झाली. जो तो 'कुलटा' म्हणून तिच्याकडे बोट दाखवू लागला. तिला नाव ठेवूं लागला. ब्राह्मणानं तिला घराबाहेर काढलं. कुलाची बेअब्रू करणाऱ्या विधवा मुलीला हीच शिक्षा त्याच्या दृष्टीनं योग्य होती.

तिला घराबाहेर हाकलून देऊन ब्राह्मण-ब्राह्मणी स्वस्थ बसली नाहीत. त्यांनी हे कृत्य दिवाणात कळवायचं ठरवलं व त्याचा सोक्षमोक्ष लावायचा असा निश्चय केला. आईवडीलांचा हा निश्चय कळताच ती कुलटा घाबरली, भयानं थरथरू लागली. आता भर दरबारात सर्वासमक्ष, आपली बेअब्रू होणार आपली धिंड निघणार, विटंबना होणार म्हणून ओशाळली. तिला कांही सुचेना शेवटी ती आपल्या लंपट जाराकडे गेली. तिचा जार म्हणजे पूर्वी बादशहाच्या दरबारातला दिवाण होता. त्याच्या गैरकारभारामुळे त्याला काढून बादशहाने जनार्दनपंतांची नेमणूक केली होती. त्याचा त्या लंपट माणसाला मनस्वी संताप आला होता. त्यानं त्या गोष्टीचा मनात डूख धरला होता व तो सूड घेण्याची संधी शोधत होता. जनार्दनपंतांच्या सत्शील वागण्यानं आणि कर्तव्यदक्ष काटेकोर कामामुळे त्याला तशी संधी मिळेना. पण आता ही संधी घेण्याचा त्यानं निश्चय केला.

जारिणीनं जेव्हां आपली व्यथा जाराला सांगितली तेव्हां जार तिला म्हणाला, ''तूं कशाला काळजी करतेस ? अगदी निश्चिंत

रहा. तुला एक युक्ती सांगतो त्याप्रमाणे सगळं तूं दरबारात सांग म्हणजे झालं.''

कोणती युक्ती सांगणार आहांत ? एखाद्या युक्तीने होण्यासारखं हे काम नाही.

मी सांगतो ते ऐक. यवन दरबारात जनार्दनपंतांचा कारभारी एकनाथ हा सर्वांना प्रिय आहे; जनार्दनपंत हा माझा शत्रू आहे. कितीतरी दिवसापासून त्याचा काटा काढायच्या विचारात मी आहे. ती संधी आज चालून आली आहे. ती कशी काय ?

मुर्ख स्त्रिये तुला दिवाणात धरून नेल्यानंतर तुझा जबाब लिहून घेतील. त्या जबाबात तूं निर्भयपणानं असं लिहून द्यायचंस, की माझ्या गर्भाचा मालक जनार्दनपंतांचा कारभारी एकनाथच आहे.

त्याच्यासारख्या सज्जन पापभीरू माणसाला यात कशासाठी गुंतवायचं ?

तुझ्या आणि माझ्या हितासाठी, एकनाथाचं नाव ऐकताच तुला सोडून देतील. तुझी विटंबना होणार नाही. पण जनार्दनपंतांची नाचक्की होईल. त्यांच्या तोंडाला काळोखी फासली जाईल. हेच मला हवं आहे, पुढची सगळी तुझी सोय मी करीन. पण मी सांगीतला तसाच जबाब तूं दिवाणात लिहून दिला पाहिजेस.

जारानं रचलेल्या कारस्थानाला संमती देऊन जारिणी घरी गेली. जारही निश्चिंत होऊन पुढे काय घडते याची वाट पहात राहीला.

इकडे ही वार्ता दिवाणात गेल्यानंतर कोतवालानं त्या स्त्रीला धरून आणण्यासाठी चार शिपाई पाठविले. त्या शिपायांनी तिला धरून आणलं व तिची चौकशी सुरू केली. तेव्हां ती जारिणी संभाविताचा आव आणून म्हणाली, ''हे कृत्य कुणी केलं हे सांगायची मला लाज वाटते. त्याचं नाव उच्चारायला माझी जीभ रेटत नाही.''

''हे कुलटा स्त्रिये, विधवा असूनही परपुरुषाचा संग करताना नि ही असली थेरं करताना तुला लाज वाटली नाही, तिथं त्याचं नांव घेताना तुला कसली लाज वाटते ? मुकाट्यानं त्याचं नांव सांग. कोण आहे तुझा जार ?''

कोतवालानं जराही दयामाया न दाखविता तिला हडसून खडसून विचारलं, तेव्हां ती मुसमुसून रडू लागली. तिला रडताना पाहून कोतवाल जरा नरमला. त्यानं विचारलं, ''तुला रडायला काय झालं ?''

रडू नको तर काय करूं ? ज्यानं माझ्यावर बलात्कार केला, तो बादशहाच्या दरबारातला फार मोठा मानाचा, अधिकाराचा माणूस आहे. मी पडले एक अबला. त्यानं माझ्या परिस्थितीचा गैरफायदा तर घेतलाच परंतु आता माझं सर्वस्व लुटलं. मला बदनाम केलं....

असं म्हणून ती आणखी मोठमोठ्याने हुंदके देऊन रडूं लागली. त्या सुंदर ललनेची असहायता बघून कोतवालाचं मन द्रवलं, त्यानं तिला समजावलं, धीर दिला, न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिलं नि तिच्या त्या उच्चपदस्थ जाराचं नांव पुन्हां विचारलं, ''तूं खरं खरं सांगितलस तर तुला पूर्ण अभय देईन'' असं म्हटलं.

तिला अभय मिळालं असल्यानं तिनं बेमुर्वतखोरपणानं सांगितलं की, ''आपल्या दरबारात जे दिवाण जनार्दनपंत आहेत त्याचा कारभारी एकनाथ, त्यानं माझ्यावर बलात्कार केला.'' तिच्या ह्या शब्दावर कोतवालाचा विश्वास बसेना, तो थक्क झाला. तेव्हां त्या जारिणीनं आपल्या पोटावर हात ठेवून गर्भाची शपथ घेऊन सांगितलं, ''विश्वास ठेवा माझ्यावर, ह्या निष्पाप गर्भाची शपथ मी सांगते ते सत्य आहे.''

तिनं शपथ घेतल्यावर कोतवालाचा तिच्यावर विश्वास बसला व त्यानं तिला सोडून दिलं. कोतवाल मात्र मनातून अस्वस्थ होता. त्याला स्वस्थ बसवेना, अखेर त्याने ही सारी हकीकत बादशहाला सांगितली. बादशहाचाही ह्या सांगोवांगी बातमीवर विश्वास बसेना. एकनाथाची योग्यता तो ओळखून होता. त्याने ह्या बातमीचा पक्का निर्णय करायचं ठरवलं व जनार्दनपंतांना बोलावणं धाडलं. जनार्दनपंत लगबगीने आले आणि बादशहाच्या तोंडून ही सारी घटना ऐकून थक्क झाले. ''माझा एकनाथ त्यातला नाही'' एव्हढंच ते बोलले. पण बादशहाची खात्री होईना. 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' करायच्या इराद्यानं यानं एकनाथालाही बोलावून घेतलं.

## परस्त्री मातेसमान

एकनाथ दरबारात हजर झाला. राजानं त्या ब्राह्मण युवतीलाही राजदरबारात हजर होण्यासाठी बोलावणं पाठवलं. ती निर्लज्ज आगावू स्त्री दरबारात हजर झाली. दोघं हजर झाल्याचं पाहून बादशहानं एकनाथासमोर त्या स्त्रिला विचारलं, ''हे ब्राह्मण स्त्रिये, तुझ्यावर ज्यानं कुणी अत्याचार केला, ते त्याच्या समक्ष इथे दरबारात सांगून टाक.''

बादशहाचं बोलणं ऐकून ती स्त्री तर अधिकच हुषारली. एकनाथाकडे बोट दाखवून ती म्हणाली, ''ह्यानंच माझी अब्रू लुटली. हाच माझ्या गर्भाचा धनी आहे.''

एकनाथ ह्या वाक्यानं दोन क्षण सर्द झाला. त्याला काय होत आहे आपण काय ऐकतो हे समजेना. स्वत:ला सावरत तो त्या स्त्रिला म्हणाला, ''माते, तुझा कांहीतरी गैरसमज होतो आहे. यापूर्वी मी तुला कधी पाहिलंदेखील नाही, परस्त्री मला मातेसमान आहे, मग तिला स्पर्श करणं तर दूरच, तुला फसवणारा पापी, माऊली, दुसरा कुणीतरी असेल, मी नाही.''

त्या स्त्रीचं धाडस एव्हढं दांडगं की, एकनाथ इतका कळवळून बोलत असूनही ती लाजली नाही. शरमली नाही. लट खोटेपणानं रडण्याचं सोंग करीत ती आक्रंदली. ''महाराज, महाराज हा मला फशी पाडतो आहे. करून सवरून मी केलं नाही म्हणतो आहे. आता मी काय करूं ? माझी अब्रू तर लुटली गेलीच आहे. पण आता भर दरबारात ह्यानं स्वत:च कृत्य नाकारून माझे धिंडवडे की हो काढले. माझा सत्यानाश केला ह्यानं.''

त्या स्त्रीचा तो विलाप ऐकून राजालाही वाटलं की, ''वय असतं मोह पडतो, पाऊल फसतं'', तसाच मोह या देखण्या एकनाथाला झाला असेल म्हणूनच ती स्त्री भर दरबारात एवढ्या ठामपणे एकनाथावर आरोप करते आहे व एकनाथ न बोलता ते ऐकून घेतो आहे.

एकनाथ सारं शांतपणानं ऐकून घेत होता. दरबारातले सारे आपआपसात कुजबुजत होते. कांही टवाळ म्हणत होते. ''बरा चांगला जोडा जमलाय, काय सुलक्षणी एकनाथ आहे; अशी पोरगी बळकावून बसलाय. पोरगी म्हणजे एकदम झकास, आता करून टाका लग्न, बादशहाच्या साक्षीनं. मंडपात लग्नाबरोबरच डोहाळ जेवणाचाही समारंभ करून टाका. आम्ही सारे अक्षता टाकायला आहोतच.

दरबारी टवाळांच बोलणं ऐकून राजा संतापला. त्यानं साऱ्यांना चूप केलं आणि एकनाथाला विचारलं, ''एकनाथा ही स्त्री म्हणते ते खरं कां ? तुला कांही यावर सांगायचं आहे काय ?''

''महाराज, मी या मातेला ओळखत नाही. तिच्याशी गैरव्यवहार मी केला नाही. याहून मला अधिक कांही सांगायचं नाही.''

''तूं नाही म्हणतोस, परंतु ही स्त्रीतर गर्भावर हात ठेवून त्याची शपथ घेऊन, तुझंच नांव सांगते आहे. मग आम्ही विश्वास ठेवायचा कुणावर ? तूं हे कृत्य केलं नाहीस याला पुरावा काय ?''

''महाराज, मी सत्यच सांगतो आहे. पण आपल्याला पुरावाच हवा असेल तर ह्या मातेच्या पोटातील गर्भच आपल्याला आपल्या जन्मदात्याचं नांव सांगेल.''

एकनाथाचं हे उत्तर ऐकून सारी प्रजा चपापली. त्या स्त्रीचं तोंडही गोरमोरं झालं, आश्चर्यानं राजानेही आ वासला. गर्भ सत्य सांगणार ? गर्भ बोलणार ? हे कसं काय शक्य आहे ?

एकनाथाचे जनार्दनपंतांच्या चरणाला हात लावला. ती धूळ आपल्या मस्तकी लावली आणि त्यास स्त्रीला पुढे बोलावलं.

एकनाथानं त्या स्त्रीच्या गर्भाला दयार्द्र स्वरात साद घातली. ''बेटा, तुझा जन्मदाता कोण आहे ? हे सत्य तूं आपल्या मुखानं इथं जमलेल्या साऱ्यांना सांग नि मला मुक्त कर.''

दरबारात विलक्षण शांतता पसरली होती. जो तो त्या कोवळ्या अर्भकाचे शब्द ऐकायला उत्सुक झाला होता. इतक्यांत आकाशवाणी व्हावी तसे शब्द उमटले ''नाथ, यांत तुमचा दोष कांहीच नाही. माझ्या जन्माचं दातृत्व या राजाच्या पूर्वीच्या यवन दिवाणाकडं जातं. ही माझी माता कुलटा आहे; जारिणी आहे. आपलं पाप लपविण्यासाठी आणि जनार्दनपंतांवर सूड उगवण्यासाठी, त्या यवन दिवाणानं हे सारं कारस्थान रचलं नि तुमचं नांव घ्यायला सांगितलं. मातेनं तुम्हाला बदनाम करण्यासाठी तुमचं नाव घेतलं.''

शरमेन त्या स्त्रीचा चेहरा काळा ठिक्कर पडला होता. तिची नजर वर उचलली जात नव्हती. इतका वेळ बेशरमपणे बडबडणारी निर्लज्ज जीभ टाळूला चिकटली होती.

जनार्दनपंतांना अतीव आनंद झाला. साऱ्या जमलेल्या लोकांनी एकनाथाचा जयजयकार केला. त्या कुलटेचा धिक्कार केला. बादशहानं त्या यवन दिवाणशला कैद करून आणलं नि त्या दोघांची गाढवावरून धिंड काढून त्यांना शासन दिलं. एकनाथावरच किटाळ दूर झालं.

अशाप्रकारे दिवस जात होते. जनार्दनपंतांनी सगळी जबाबदारी एकनाथावर सोपवली होती. दिवाण म्हणून जमाखर्च हिशोबापासून सर्वच गोष्टी एकनाथ पहात होता.

## हिशेबाचा कटाक्ष

एक दिवस जनार्दनपंतांनी एकनाथाजवळ सगळा हिशोब पहायला मागितला . एकनाथानं खर्डा खतावणी काढून झडती घेतली. जमेचा आकार मांडला. खर्चाचा मेळ काढला. त्यातून बाकी किती उरते ते पाह्यलं. ताळा केला नि ताळा करताना त्याच्या लक्षात आलं की एका आकड्याची कुठंतरी गफलत होते आहे. ताळा बरोबर येत नाही. बेरीज चुकते आहे. एकनाथ विलक्षण अस्वस्थ झाला. काय करावं त्याला सुचेना.

जनार्दनपंतांची सारी सेवा पार पाडून, रात्री त्यांना झोप

लागेपर्यंत त्यांचे पाय चुरून, एकनाथ मध्यरात्री पुन्हां हिशेब लिहायला बसला. तन मन अर्पून तो सारा हिशेब डोळ्यात तेल घालून करत होता. चूक होऊं नये याची खबरदारी घेत होता.

जनार्दनपंतांना अचानक जाग आली. दिवा पाहून ते उठले, त्यांनी बघितलं एकनाथ हिशेब करत होता. त्याला कसलं भान नव्हतं. रात्रीचे प्रहर उलटत होते, पण एकनाथ आपला जागाच होता. अंथरूणावर जनार्दनपंत जागे होते.

इतक्यात त्यांनी, एकनाथानं अतिशय आनंदाने वाजविलेल्या टाळ्या नि त्याच दिलखुलास हास्य ऐकलं. एकनाथाला चूक सापडली होती. एक आकड्याची चूक सापडून ताळा बरोबर जमला होता. अचूक निघाला होता नि म्हणून न राहून एकनाथ अत्यानंदानं ओरडला होता, ''सापडला रे सापडला''

''एकनाथा काय सापडलं रे ?''

''स्वामी, एका आकड्याची चूक होती. ती सापडली.''

हात्तिच्या, अरे श्रीहरी सापडल्याच्या थाटात तूं ओरडलास, सापडला रे सापडला. त्या आकड्यासाठी कां तूं इतका एकाग्रचित्त करून हिशेब करत बसला होतास ? नाथा, हीच एकाग्रता, समरसता, त्या श्रीहरीदर्शनासाठी, लावशील तर तुझ्या आयुष्याचं सार्थक होईल.''

स्वामी, माझी हीच इच्छा आहे; आपणच मला अनुग्रह देऊन तारा, माझ्या भवदु:खाचं हरण करा.

असं म्हणून एकनाथाने दौत लेखणी सद्‌गुरूच्या पायी ठेवली आणि हिशेब सादर केला.

''हा नरदेह सालमजकूर पाहतो. कर्म म्हणजे पूर्व गुदस्त. अक्षरप्रेम म्हणजे प्रेमपत्र असं धरून आपल्याला मी हा झाडा देतो. हा झाडा म्हणजे नरदेहाचा झाडा; अज्ञानाची बाकी उदंड आहे. म्हणून मी आपल्याला शरण आलो आहे. खुदखत हे सोहं अक्षरी आहे. ते मी माझ्या शिरी धारण केलं आहे. मी आपल्या पायाशी आलो आहे. मला उद्धरून न्या.''

एकनाथाला आपल्या हृदयाशी धरून जनार्दनपंतांनी त्याला रामनामाचा तारक मंत्र दिला. त्या मंत्रानं एकनाथ मनात स्वस्थ झाला. आपली नित्यनैमित्यिकं आवरून जपजाप्य करू लागला.

## यतीचा प्रसंग

एक दिवस जनार्दनपंत त्याला म्हणाले, ''तुला आता अवधूतदर्शन घडवतो आपण वन-विहारासाठी जाऊ. वाटेत कांहीही झालं तरी तूं माझी कास सोडायची नाहीस. मी ज्याच्याशी जसं वागेन. बोलेन तसंच तूं बोलायचस. घाबरून पळून जायचं नाही. मी तुझं कधीही अहीत करणार नाही.''

जनार्दनपंतांच्या बोलण्याला संमती देऊन, एकनाथ त्यांच्याबरोबर निघाला. चालता चालता त्यांनी कितीतरी डोंगर ओलांडले, जंगले पार केली. चालूनचालून एकनाथ दमला होता. पण गुरूची पाठ त्यानं सोडली नाही.

तेव्हढ्यात त्यांना समोरून, रेड्यावर बसलेला एक अक्राळविक्राळ यती येताना दिसला. तो दिसायला अत्यंत हिडीस, क्रूर दिसत होता. रेड्यावर त्याच्या पाठीमागे त्याची वृद्ध आई बसलेली होती. एकनाथाला त्याला पाहूनच धडकी भरली. तो यती त्यांच्याच दिशेने येत होता. जनार्दनपंत मात्र जराही न थांबता आपला मार्ग आक्रमत होते. नाईलाजानं एकनाथालाही मागोमाग जाणं भाग होतं.

एव्हढ्यात तो यती रेड्यावरून खाली उतरला. आपल्या कर्कश्य स्वरात तो ओरडून आपल्या मातेला म्हणाला, ''थेरडे, मला अतिशय भूक लागली आहे. काय असेल ते रांधून घाल. चल आटप लवकर....''

म्हातारीने तीन दगड मांडले.जाळ पेटवला. हंडा ठेवला. रेड्यावर जी पथारी होती त्यांत कोंबड्यांची टोपली होती. त्या टोपलीतल्या कोंबड्या तीनं काढल्या, त्यांच्या मुंड्या मुरगाळून त्या हंड्यात टाकल्या, कबूतरही माना मोडून टाकली पण हंडा कांही भरेना तेव्हां बरोबर असलेली कुत्री, मांजरही तिनं मारून हंड्यात टाकली. तरी हंडा आपला तळालाच. ते पाहून त्या क्रूर यतीला अत्यंत संताप आला. त्यानं आपल्या हातातल्या फरशीनं रेड्याचे चार तुकडे केले नि तापलेल्या हंड्यात टाकले, खाली चुलीतला जाळ रसरसून पेटला होता.

म्हातारीने आत हंड्यात डोकावलं, ती निराश झाली. हंडा तरीही रिकामाच होता. तिनं आपल्या मुलाकडे, यतीकडे पाह्यलं. यती क्रुद्ध झाला होता. तो संतापाने म्हातारीच्या अंगावर धावला, अन् त्यानं म्हातारीची खांडोळी करून हंड्यात टाकली. हंडा पूर्ण भरला. हंड्यातलं बडम् रटारटा शिजू लागलं.

हे सारं भयंकर दृश्य एकनाथ थिजून पहात होता. त्याचं रक्त गोठलं होतं. शिसारी आली होती. केव्हां इथून पळून जातो, असं त्याला झालं होतं. पण एव्हढ्यावर भागणार नव्हतं.

रटारटा शिजलेलं मास त्या यतीनं अधाशासारखं आपल्या थाळीत वाढून घेतलं आणि इकडेतिकडे बघीतलं. जनार्दनपंत व एकनाथ त्याच्या दृष्टीस पडले. त्याला अतिशय आनंद झाला, त्यानं हर्षानं त्या दोघांना हाक मारली, ''आओ बम्मन खाना

खाओ'' आणि त्यांच्या संमतीची वाट न बघताच, त्यांच्या थाळ्या त्यानं तयार केल्या.

एकनाथाच्या अंगावर सरसरून काटा आला. त्याचं पाऊल उचलेना. जनार्दनंपत मात्र त्या यवन यतीनं बोलावताच अत्यानंदानं पुढे गेले नि त्याच्याच थाळीत खायला बसले. भाऊ भाऊ असल्यासारखे दोघे भुरके मारून जेवू लागले.

एकनाथाला मात्र हे सहन झाले नाही. तो शक्य तितक्या वेगाने दूर पळू लागला. जनार्दनपंतांनी त्याला खूप हाका मारल्या पण त्याच्या एकाही हाकेला ओ न देताच एकनाथ पळून गेला आणि खूप लंब जाऊन बसला.

थोड्या वेळाने जनार्दनपंतांनी त्याला गाठलं नि ते म्हणाले, ''मी सांगितलं ते तूं विसरलास, मी हाका मारत असूनही दूर गेलास; चिंतामणी फेकून दिलास. अरे साक्षात दिगंबराचा प्रसाद डावललास. तरी मी तुला बजावत होतो.''

सद्गुरूराया, जे झालं ते सारं अनर्थकारक होतं मला त्याचा कांही अर्थबोधच झाला नाही. आपण मला त्याचा अर्थ सांगा.

''अरे, नाथा तो यती म्हणजे अवधूत, त्याची वृद्ध माता म्हणजे माया, या मायेनंच सारा खेळ खेळला जातो. सत्व, रज, तम गुण म्हणजे तीन दगड. हांडी म्हणजे जगाची साठवण. अग्नी म्हणजे तेज; लोभ आणि मोहाचं त्याला घातलेलं इंधन, कोंबड्या म्हणजे प्रकृती, पांखरं म्हणजे प्रकृतीला होणारा विकार, कुत्री व मांजरी म्हणजे भेद-अभेद. अहंकाराचं प्रतिक रेडा. असं जे सारं ते एक दिवस विरून जातं. जे जे दृष्यमान आहे ते ते लोप पावतं; उरलं ते फक्त परब्रह्मचैतन्य. परब्रह्मपरेश तोच तो जगद्गुरू अवधूत. तो अवधूत साक्षात तुझ्या दारी आलेला असताना नाथा, तूं त्याला डावललंस, पळून गेलास. तुला काय म्हणायचं ?

जनार्दनपंताच्या या बोलण्यानं एकनाथाला उपरती झाली. तो अनन्यभावाने गुरूंना शरण गेला, गुरूनं पुन्हां दर्शन घडवण्याचं कबूल केलं.

## एकनाथाचे तीर्थाटन

असेच कांही दिवस गेले, एकनाथाला बरोबर घेऊन, पंत तीर्थाटनाला निघाले, जाता जाता वाटेत एका घनघोर जंगलात, घोड्यावरून एक तेजस्वी पठाण येताना दोघांना दिसला. त्याला पाहून एकनाथ बाजूला गेला पण जनार्दनपंतांनी मात्र त्या पठाणाचे पाय धरले; साक्षात लोटांगण घातलं नि मागच्याच प्रसंगाची पुनरावृत्ती होऊन तो पठाण आणि पंत एकत्र जेवायला बसले. पठाणाने एकनाथालाही जेवायला बोलावलं पण नाथानं ते नाकारलं.

नशीब करंट असलं की दारात कल्पवृक्ष असूनही तो कळत नाही. त्याला कळून घेण्याची इच्छा होत नाही. तशीच अवस्था एकनाथाची झाली. दुसऱ्या वेळीही एकनाथ कोरडाच राहीला. परंतु मनात मात्र त्याला दत्तदर्शनाची अतितीव्र ओढ लागली होती.

एकनाथाला अवधूत दर्शनाचा जणूं ध्यास लागला होता. तो भोळ्याभाबड्या स्वभावाचा होता. श्रीचरणावर त्याची आत्यंतिक श्रद्धा होती परंतु आपपर भाव मावळला नव्हता. आणि त्यामुळे सर्वात्मक परमात्मा बघण्याची कुवत एकनाथामध्ये आली नव्हती. त्याच्या ह्या उणीवेनेच त्याचा तोटा केला होता. मनाची तळमळ, अधीरता आता शिगेला पोहोचली. ध्यानीमनी सद्गुरूंचं सोज्वळ काषायवस्त्रधारी रूप त्याला दिसायला लागलं. एक दिवस न राहवून तो जनार्दनपंतांना म्हणाला, ''पंत, आता अधीरल्या मनाला धीर धरवत नाही; मला आता त्या श्री सद्गुरू समर्थांचं दर्शन घडवा. त्यांची गाठ घालून द्या.''

एकनाथाची आस पंतांना जाणवली, ते त्याला घेऊन तीर्थाटनाला निघाले. निघताना त्यांनी नाथाना बजावलं, ''पुन्हां सांगतो, एक्या तुला, मी ज्याची पाठ धरीन, ज्याला वंदन करीन, ज्याच्या सोबत राहीन, त्याला तूं वंदन कर. त्याचे पाय धर. त्याला अनन्य भावानं शरण जा.''

एकनाथानं पंतांच्या म्हणण्याला होकार भरला आणि गुरू-शिष्य जंगल तुडवू लागले. इतक्यात एक मलंग समोरून येताना पंतांना दिसला. त्याचा वेष सगळा मुसलमानी पद्धतीचा होता. काखेत झोळी होती. मोरपिसांचा कुंचा होता. खांद्यावर फावडं होतं. पायात पादुका होत्या. बस्ताबंद नेटका बांधला होता. त्याचे नेत्र आरक्त विशाल होते. रंग खेत होता. कांती तेजस्वी होती. वण तेजाळ उग्र होता. असा तो मलंग समोर येताच जनार्दनपंतांनं त्याला मनोभावाने नमस्कार केला. यवनी भाषेत तो मलंग जनार्दनपंतांशी बोलला आणि त्यानं पंतांना आपल्या हृदयाशी धरलं.

दोघेही एका झाडाखाली बसले. एकमेकांशी गुजगोष्टी करूं लागले. मलंगाने आपल्या झोळीतून न्याहरी काढली आणि पंतांसह तो भोजनाला बसला. एकनाथाला तो वर्णसंकर सहन होईना, त्याचं उष्ट पंत खात आहेत, ही कल्पनाच त्याला रूचेना; तो दूर उभा राहून ते सारं दृष्य पहात होता.

जनार्दनपंतांना श्रीसद्गुरू अवधूतांनी विचारलं, ''कोण आहे हां ? त्यालाही बोलाव प्रसाद खायला. आपल्या पंक्तीला बसून तो

ही भोजनाचा लाभ घेईल.''

सद्गुरूंनी असं सांगताच जनार्दनपंतांनी नाथाला खुणावलं, नि मागच्या प्रसंगाची आठवण देत सांगितलं, ''मनातला भेदाभेद टाळून प्रसाद घ्यायला त्वरीत ये नि या अवधूत योगीराजाच्या पायावर प्रेमानं डोकं ठेव. त्याला अनन्यभावानं शरण जा. विपरीत भावनेचा त्याग कर.''

सद्गुरूंचे हे परवलीचे शब्द ऐकून भीतभीतच एकनाथ जवळ येऊन उभा राहीला. मात्र त्या मलंगाच्या पानात जेवायला बसला नाही. आर्जवी स्वरात त्यानं फक्त पंतांना विनंती केली, ''आपला प्रसाद मला द्यावा, आपल्यावाचून माझे लाड कोण पुरवणार आहे ?''

कनवाळू जनार्दनपंतांनी आपल्या पुढ्यातले घास त्याच्या हातावर ठेवले. नाथाने ते तोंडात घालण्याऐवजी पानात गुंडाळून ठेवले. पानात गुंडाळून घेतलेला तो प्रसाद घेऊन तो दूर जाऊन बसला. पंतांचं व मलंगाचं भोजन संपल्यावर मलंगाने आनंदाने ढेकर दिला. तो तृप्त झाला. समाधानानं फुलला. बोलताबोलता एकनाथाकडे बोट दाखवून त्यानं पंतांना विचारलं, ''हे मूल कुणाचं ? याचा वर्ण कोणता ? नांव काय ?''


नाथ युद्धभूमीवर....

दत्तात्रेयांनी हे विचारताच पंतांनी उत्तर दिलं, ''हा ऋग्वेदी ब्राह्मण आहे. याचं नांव एकनाथ. हा अतिशय भाविक, श्रद्धाळू आणि प्रेमळ आहे. बालपणापासून हा माझ्याजवळ राहून माझी सेवा करतोय. कामकाजात मला तत्परतेने मदत करतो. तो मनानं निर्लोभी, निरासक्त, उदास आहे. त्याची ही वृत्ती पाहून त्याच्यावर दया करावी. त्याला आपण अनुग्रह द्यावात असं मला फार वाटतं.''

''पण त्याचं अज्ञान त्याच्याआड येत आहे. आपल्याला पाहून तो दूरदूर पळतो आहे. दोन वेळा त्यानं आपल्या दर्शनलाभाची संधी हुकवली, पण आता आपल्याला माझी नम्र विनंती आहे की त्याच्यावर आपण अनुग्रह करावात. त्याचं अज्ञान नाहीसं करावत, त्याला अद्वयत्वाची, अभेदतत्त्वाची जाणीव द्यावीत.''

पंतांचं हे बोलणं संपतं ना संपतं तोच एकनाथ धावत आले नि त्यांनी त्या मलंगाच्या पायावर अनन्यशरण भावानं डोकं टेकलं. चित्त एक केलं. कितीतरी दिवसांची आस आज पुरी झाली होती. एकनाथाला दत्तात्रेय भेटले होते. श्रीसद्गुरू दत्तात्रेयांनी नाथांना आशिर्वाद दिला. ''तुझ्या हातून समाजसेवेचे उदंड कार्य घडेल, तुला हृषीकेशी प्रसन्न होईल. तो तुझे सर्व मनोरथ पूर्ण करील. श्रीमदभागवताचा एकादश स्कंद व्यासाप्रमाणे तूं ओवीबद्ध करशील, वेदशास्त्र पारंगत होशील. त्या एकादश स्कंद पुराणावर प्राकृतातून टीका रचशील, वाल्मीकी सारखं प्राकृतात भावार्थ रामायण रचशील, तूं रचलेल्या अभंग, पदांना तर तोड राहणार नाही.

आपल्या अवीट,रसभरीत वाणीनं हा सर्वांना प्रिय होईल. चक्रपाणी याचा सदैव पाठीराखा होईल. याची कीर्ती त्रिभुवनात गाजेल. खरं तर हा ईश्वराचाच अवतार आहे. पण मनुष्यरूपात प्रगटला आहे. जनार्दना तुझ्यासारखा थोर तूच की तुला हे एकनाथासारखं रत्न लाभलं, तूं याचा प्रतिपाळ कर, याला ज्ञान दे. तूं एकनाथाचा सद्गुरू आहेस. माझ्यावर त्याची श्रद्धा आहे तशीच माझी ही त्याच्यावर अखंड कृपा आहे आणि पुढेही राहील. फक्त तूं अधिकारी म्हणून तुझ्याजवळचं अध्यात्मज्ञान, गुह्यज्ञान त्याला दे, परमार्थमार्गाचा त्याला अधिकारी बनव....''

असं म्हणून दत्तात्रेय गुप्त झाले. गुप्त होताना त्यांनी जनार्दनपंतापाशी विडा दिला. पंतांनी त्यातला एक घास एकनाथाच्या मुखात घातला नि ते दोघे स्वगृही परतले.

घरी आल्यानंतर एकनाथानं पंतांपाशी हट्ट धरला की, ''अध्यात्मज्ञानाचं विवरण करा. गुप्तज्ञानाची महती सांगा. आणि माझ्यावर अनुग्रह करा. कुंडलिनी जागृत करून द्या.''

## एकनाथांवर अनुग्रह

एकनाथाचा हट्ट मान्य करून पंतांनी श्री दत्तात्रेयाच्या आज्ञेनुसार एकनाथाला सर्व गुह्यज्ञान उकलून दाखवले.

त्याच्यावर अनुग्रह केला नि त्याला देवगडावरल्या एका पर्वतावर अनुष्ठानास बसण्याची आज्ञा केली. पूर्वी याच ठिकाणी मार्कंडेयऋषींनी तप केलं होतं. तप करण्यासाठी हे अतिशय उत्तम स्थळ होतं.

देवगड पर्वतावरल्या एका गुहेत, जनार्दनपंतांचा आशीर्वाद घेऊन एकनाथ अनुष्ठानाला बसला. ऊन, वारा, पाऊस, थंडी या कशाकशाची पर्वा न करता, भूक, तहान, झोप या सर्व गोष्टींचा त्याग करून त्यानं अनुष्ठानाला प्रारंभ केला. ती साधना तो एकनिष्ठेने, अनन्यभावानं करू लागला.

एकनाथ एकाग्रचित्त होऊन होऊन साधना करीत असताना एक विशाल फणीचा नाग नाथाला वेढा घालून बसत असे आणि आपल्या फडेनं नाथाच्या डोक्यावर सावली धरत असे. नाथाला या गोष्टीची जरासुद्धा जाणीव नव्हती. तो आपल्या तप:साधनेत दंग असे. साऱ्या जाणीवा त्या परब्रह्माच्या ठिकाणी केंद्रीत झालेल्या असल्यानं. त्याला बाह्य जगाचा पूर्णपणानं विसर पडलेला असे. पण एकनाथाची मनोभावे सेवा करणारा एक शेतकरी रोज एकनाथासाठी दूध घेऊन येत असे.

एक दिवस काय झालं, शेतकऱ्याला नेहमीच्या वेळेपेक्षा दूध घेऊन यायला उशीर झाला. नाथ ध्यानमग्न होते. नेहमीप्रमाणे तो नाग आपला फणा पसरून नाथांच्या डोक्यावर छाया धरून, त्याना वेटोळं घालून बसला होता. त्या भल्या थोरल्या नागानं, नाथाना वेटोळं घातल्याचं पाहून, शेतकऱ्याचे धाबे दणाणले भितीने तो जोरात किंचाळला, नागाला हाकलून लावण्याचा प्रयत्न करू लागला. पण नाग काही जागचा हालेना. नाथही आपल्या समाधीत मग्न होते. त्यांना काय घडतंय, काय चाललंय या कशाचंच भान नव्हतं.

नाथांची समाधी उतरताच तो नाग आपोआप खाली उतरला नि शांतपणशनं निघून गेला. शेतकऱ्यानं येऊन नाथांच्या पायावर डोकं ठेवलं आणि घडलेली सारी हकीकत त्यांना सांगितली. ती नागकथा ऐकून नाथांनाही आश्चर्य वाटलं. त्यांनी गरुडाची प्रार्थना केली. गरुड साक्षात त्याच्यापुढे हजर झाला. गरुडाने नाथांना अलिंगन दिले. गरुडध्वजाचं दर्शन त्या शेतकऱ्यालाही झालं, तो मनोमन सुखावला, धन्य झाला. एकनाथाला आणि गरुडध्वजाला वंदन करून तो आपल्या घरी गेला.

इतक्यात प्रत्यक्ष हृषीकेशी एकनाथापुढे प्रगट झाले आणि म्हणाले, ''नाथा, मीच तुझ्यावर नागरूपानं फणा धरून उभा होतो; तुला सर्वप्रकारे साह्य करायला मी सदैव तुझ्या सोबत आहे हे लक्षांत ठेव.''

जनार्दनपंतांनी एकनाथाला सांगितलं होतं की कांही विशेष घडलं, साक्षात्काराचा लाभ झाला, तरच मला सांगायला ये. हृषीकेशाची नि गरुडध्वजाची भेट होणं हा अलभ्य लाभ होता. तो अनुभव सद्‌गुरूला सांगितल्यावाचून त्याला चैन पडेना. तो धावत पळत वेगानं जनार्दनपंतांकडे आला.

सगळी हकीकत ऐकून जनार्दनपंतांना अतिशय आनंद झाला. नाथाची तपश्चर्या पूर्ण झाली होती. त्याचीच ही पावती होती. जनार्दनपंतांनी नाथाला तिर्थाटनाला जाण्याची आज्ञा केली.

स्वामींच्या आज्ञेप्रमाणे नाथ तिर्थयात्रेला निघून गेले आणि थोडयाच दिवसात नाथांचे आजोबा चक्रपाणी यांचे पत्र जनार्दनस्वामींच्या हाती पडले. त्यात त्यांनी लिहलं होतं, ''बरेच दिवस झाले नातवाला पाहिला नाही. आता फार वार्धक्य आले आहे. नातू जवळ असावा असं फार वाटतं. सूनमुख पहाण्याचीही फार इच्छा आहे. कृपा करून तेव्हढी पुरी करावी.''

स्वामींनी पत्र वाचलं परंतु नाथ आता नक्की कुठे असेल हे सांगणे कठीण होते. मात्र काही असलं तरी तीर्थयात्रा करीत तो एक ना एक दिवस पैठणात नक्की येईल हे जाणून नाथाच्या नावाने स्वामींनी एक आज्ञापत्र लिहीले आणि जासूदाकडे देऊन त्यास रवाना केले. स्वामींनी आपल्या पत्रात लिहीले होते, ''नाथा, हे पत्र तुझ्या हातात पडेल तेव्हां तूं जिथं असशील तिथंच थांब. पुढे जाऊ नकोस.''

### एकनाथांचे लग्न

स्वामींच्या अटकळीप्रमाणे तीर्थयात्रा करीत करीत एक दिवस एकनाथ पैठणात येऊन पोहचले. आणि स्वामींचे आज्ञापत्र त्यांच्या हाती पडले. गुरूआज्ञा शिरसावंद्य मानून नाथ जीथे पत्र हाती पडले त्या जागीच थांबले. पुढे त्याच जागी पैठणात नाथाचा वाडा उभा राहीला. स्वामींना सांगावा धाडला गेला. स्वामी आले, आले तेच मुळी नाथांचे लग्न ठरवून. त्रिविक्रम शास्त्र्यांची गिरीजा त्यांनी नाथासाठी वधू नेमस्त केली होती. नाथांचे लग्न झाले. नाथ संसारी बनले.

नाथांचे संसारी जीवन सुरळीत सुरू झालं. हा हा म्हणता ८-९ वर्ष कापरासारखी उडून गेली. गिरीजेबरोबर करवला म्हणून माहेरून आलेला उद्धव नाथाचाच होऊन नाथांकडे राहीला. आल्यागेल्याची उठबस पाहू लागला. कुणीही अतिथी नाथांकडे येवो त्याचे यथोचित स्वागत होऊ लागले. दिनदुबळ्यांना दलितांना नाथ तर पंढरीचा पांडुरंग पैठणात आल्यासारखे वाटू लागले. नाथ तर दलितमित्रच बनून गेले होते.

नाथांच्या जीवनात ८-९ वर्षात बऱ्याच घडामोडी घडून गेल्या. ज्यांना जीवन सर्वस्व मानले ते सद्‌गुरू जनार्दनस्वामी समाधिस्त

झाले. नाथ एकटे उरले. अगदी एकलेपणाचं एकाकी जिवन सुरु झालं.

भल्या पहाटे उठावं, गोदावरीच स्नान करावं, संध्या देवपूजा आटपावी नंतर ग्रंथवाचन करावं आणि मग उरला वेळ प्रापंचिक कार्यासाठी खर्च करावा. सायंकाळी धूपदिप आरती करून भोजन उरकावे. आणि उर्वरीत काळ भगवद्‌चिंतनात व्यतित करावा असा दिनक्रम ठरून गेलेला होता.

पैठणात त्या काळी किर्तन आणि प्रवचनाचा मोठा ज्ञानयज्ञच सुरु झाला होता. म्हणायचं किर्तन पण प्रत्यक्षात मात्र ह्याच्या त्याच्या नावानं शिमगा चाललेला असायचा. नाथांच्या कानी हे आलं आणि त्यांनी आपल्या वाड्यात किर्तन करणे सुरु केलं. हळूहळू नाथांची किर्ती कर्णोपकर्णी पसरु लागली. आणि नाथांच्या वाड्यावर अलोट जनसमुदाय जमू लागला. नाथांच्या वाड्यावर कुणालाही मज्जाव नव्हता. त्यामुळे दलितवर्गही मोठ्या संख्येने येऊ लागला.

एक दिवस नाथांचे किर्तन ऐकायला एक वडारी जोडपे आले. पहातात तो तोबा गर्दी, कुठूनही आत शिरायला जागा नाही. म्हणून ते मागल्या दाराने आत शिरले आणि नाथांच्या पलंगावर येऊन बसले. दिवसभराच्या श्रमाने दमलेलं ते जोडपे किर्तन ऐकता ऐकता पलंगावर लवंडले आणि गाढ झोपी गेले. थोड्यावेळाने किर्तन संपल्यावर नाथ आत आले. पहातात तो दोघेही गाढ झोपलेले. उद्धव त्यांना उठवू लागला, त्यावर नाथ उद्धवाला म्हणाले अरे वेड्या साक्षात माझा श्रीहरि आणि माता लक्ष्मी आहे ती. पहा कसे शांत झोपलेत दोघे. त्यांना मुळीच हलवू नकोस आणि जागेही करू नकोस. चल मला आत ओटचावर एक घोंगडी टाकून दे म्हणजे झालं !

नाथांच्या मनाचा हा मोठेपणा गगनाहूनही विशाल होता. नाथ जसे बोलत तसेच प्रत्यक्ष वागतही होते. सर्वाभूती सर्वात्मक पाहणारे नाथ खरोखरच अद्वितीय पुरुष होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते जोडपं झोपेतून जागं झालं तेव्हा आपण नाथांच्या पलंगावर येऊन झोपलो ही चूक त्यांच्या लक्षात आली. आणि नाथांची क्षमा मागण्यासाठी ती दोघ निघाली. दार उघडतात तर नाथ दारातच उभे. दोघेही झटकन् नाथाचे पाय धरायला खाली वाकले. नाथांनी दोघांनाही आशिर्वाद दिला. त्या वडाऱ्याला वस्त्र देऊन आणि त्याच्या बायकोची गिरजाबाईकडून खणा-नारळानी ओटी भरून त्यांना रवाना केले. दोघेहीजण नाथांचे गुणगान गातच आपल्या झोपडीकडे परतले.

अशातऱ्हेने दिवसेंदिवस नाथांच्या किर्तीचा परिमल दाही दिशांना पसरु लागला होता. त्यामुळे मात्र ढोंगी पोथीनिष्ठांचे धाबे दणाणू लागले. किर्तन प्रवचनाच्या नावावर जनसमुदाय जमवून पोरटोरं आणि बाया-बापड्यांना जमवून टिंगलटवाळी करणाऱ्या आणि स्वतःची टिमकी वाजवून घेणाऱ्या प्रवचनकारांच्या प्रवचनाची गर्दी ओसरू लागली.

जनसमुदायाची चाललेली कुत्तरओढ ढोंगी जपी, तपी, महंत यांनी धर्माच्या नावावर समाजाची चालवलेली लूट, दिन दलितांवर चाललेले अत्याचार सारं कांही नाथांच्या लक्षांत आलं होतं. आणि त्या अनुषंगाने हरिनामाची संथा समाजाला देता देता पुराणांतरी असलेले दाखले उकलून दाखविता दाखविता त्यांनी रंजल्यागांजल्या दलित वर्गाला आपल्या जवळ केले. या साऱ्यांचा उद्धार कसा होईल; यांना या निराशेच्या अंधारातून बाहेर कसे काढता येईल हा एकच विचार नाथांच्या मनी सतत भरून उरला आणि हा ज्ञानसूर्य त्या दृष्टीने आपले उदयाचलं शोधू लागला.

## नाथांचा कनवाळूपणा

आता नाथांची किर्ती साऱ्या पैठणभर पसरली होती. ज्याच्या त्याच्या तोंडी नाथांचेच नाव होते. नाथ म्हणजे संत. नाथ म्हणजे खरा सत्पुरुष असं जो तो म्हणू लागला होता. नाथांची ही चाललेली वाहवा मात्र पैठणातल्या टवाळांना रूचली नाही. त्यांनी नाथांची फजिती करायची ठरवली.

पैठणात एक कुप्रसिद्ध असा कुचर ओढा होता. तीथे नेहमी ह्या चार-सहा टवाळांची टोळी गावच्या कुटाळक्या करीत बसलेली असायची. त्यांनी एक डाव रचला.

नाथ आपल्या दिनक्रमाप्रमाणे रोज गोदावरीस्नानास जात असत. त्यांचा जाण्यायेण्याचा रस्ता एका मशिदीवरून जात होता. झालं ठरलं, त्यांनी एका यवन मुसाफिराला फितवला आणि नाथ त्या रस्त्यावरून स्नान करून आले की पान खावून त्यांच्या अंगावर थुंक असे त्याला सांगितले.

दुसरा दिवस उजाडला. नाथ गंगेवरून स्नान करून मशिदीजवळ आले तसा दबा धरून बसलेला यवन पुढे झाला आणि त्यांच्या अंगावर थुंकला. नाथ शांतपणे मागे वळले, पुन्हां नदीच्या पात्रात शिरले, स्नान केले आणि आपला मार्ग चालू लागले. मशिदीजवळ येताच पुन्हां तोच प्रकार घडला. नाथ पुन्हां मागे फिरले असे एक ना दोन अनेक वेळा झाले. परंतु नाथ चिडले नाहीत की काही बोलले नाहीत. यवनाने अंगावर थुंकावे आणि नाथांनी मागे फिरून पुन्हां स्नान करून यावे हा क्रम कितीतरी वेळपर्यंत सुरूच होता. अखेर तो यवनच खजील झाला आणि नाथांना शरण आला. त्याने नाथांचे पाय धरले आणि मला मार्ग दाखवा म्हणून गयावया करू लागला. नाथांनी त्याला सदुपदेश केला आणि भवतापातून पार नेणारा गुरुमार्ग दाखवला.

चुकून जरी लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला तरी त्याचे सोने होऊन जावं हा जसा परिसाचा गुण अगदी तसेच नाथांचे चालले होते. जो जो पुढ्यात येईल त्याचा त्याचा कोणताही भेदाभेद न पाहता उद्धार करून टाकायचा हे नाथांचं ब्रीद.

एक दिवस नाथ असेच सिद्धेश्वराच्या दर्शनाला निघाले होते. वाट एका गल्लीतून जात होती. इतक्यात समोरच्या माडीवरून एक लावण्यवती जीना उतरून धाडधाड खाली आली आणि नाथांच्या समोर रस्त्यात हात जोडून उभी राहीली, म्हणाली, ''नाथ, आपले दर्शन झाले भाग्य माझं.'' असं म्हणून अक्षरश: तीने नाथांच्या चरणी मस्तक ठेवलं; आणि नाथांची स्तुती आरंभिली.

नाथांना वाटलं किर्तनाला येणारी असेल कुणी सुवासिनी. नाथांनी चौकशी केली तेव्हां ती एक वेश्या असल्याचं नाथांना कळलं. आपला उद्धार व्हावा या हेतूनं ती नाथांना शरण आली होती. नाथांना आपल्या घरी येण्याची विनंती करू लागली. नाथांनी तिची विनंती मान्य केली. नाथ तिच्या घरी गेले. तिला रामकृष्ण हा मंत्रजप त्यांनी दिला; आणि उद्धाराचा मार्ग दाखवला.

अशातऱ्हेने योग्य उपदेश करून आणि त्या हिराबाई वेश्येला मुक्तीचा सोपा मार्ग सांगून नाथ घरी परत फिरले. परंतु पैठणात या गोष्टीचा विपर्यस्त बभ्रा झाला. नाथ वेश्येकडे गेले होते. असे जो तो म्हणू लागला. नाथांचे थोरले चिरंजीव हरिपंडीत यांच्या कानी ही वार्ता पडली आणि त्यांनी घरी येऊन आईजवळ मोठे आकांडतांडव माजवले. नाथांच्या कानी ह्या सर्व गोष्टी गेल्या पण त्यांनी तिकडे कानाडोळा केला.

नाथांचे जीवन एखाद्या धिरोदात्त महासागरासारखे होते. एक दिवस दुपारचे नाथ सहज आठवण झाली म्हणून आपल्या बालपणीच्या आवडत्या नाग घाटावर आले. उन्हाळ्याचे दिवस होते. ऊन नुसतं रणरणत होतं. खाली वाळू सणसणून तापली होती. अशा स्थितीत एक तीन-चार वर्षाचं उघडं नागडं मुल आपल्या आईला शोधीत त्या तापल्या वाळूत उभं होतं. पायाला चटके बसत होते आणि मुल सारखं आक्रोश करीत होतं. नदीच्या पलीकडे काठावर टरबूजाची शेती होती. त्यात माणसं राबत होती. पण कुणाचंही त्या मुलाकडे लक्ष नव्हतं. नाथांना त्याची दया आली. त्यांनी त्याला उचलून घेतलं. त्यांना जाणवलं की हे मुल महारवाड्यातीलच आहे. म्हणून ते त्याच्या आईवडिलांचा शोध घेत महारवाड्यात येऊन पोहोचले. तो मुलगा राणू महाराचा होता. आपल्या दहा वर्षाच्या बहीणीबरोबर राईबरोबर टरबूजाच्या शेतात गेला असताना चुकला होता. नाथांनी त्या मुलाला त्याच्या आईवडिलांकडे पोहचवला; आणि ते परत फिरले.

नाथ महारवाड्यात आले याचंच साऱ्यांना कौतुक वाटले. कारण सारा महारवाडा नाथांना देव मानीत होता. ''आज देव येऊन गेला, देव येऊन गेला.'' असा सारा गलका माजला. नाथ महारवाड्यात जाऊन आले तेव्हां राणू महाराची राई घरी नव्हती. ती जेव्हां घरी आली तेव्हां तिला समजले की देव आपल्या घरी येऊन गेले. अजाण बालमन ते देवाला पहाण्यासाठी तसंच मागे वळलं आणि नाथांच्या वाड्याकडे धावत सुटलं. राई येऊन नाथांच्या पुढ्यात उभी राहीली. तिनं आपल्या देवाला डोळे भरून पाहिलं आणि जेवायला यायचं आमंत्रण देऊन टाकलं; आश्चर्य म्हणजे नाथांनी ते स्विकारलंही. राई आनंदानं उड्या मारत घरी गेली आणि तिने आपल्या आईवडिलांना सांगून टाकलं की देव आपल्या घरी जेवायला येणार आहेत.

चल वेडी कुठली. देव कसे येतील जेवायला आपल्याकडे ? तिची भोळीआई राईची समजूत घालीत म्हणाली.

अगं, खरंच सांगते मी, मला देवानी सांगितले. तसं हवं तर बाबांना पाठव विचारायला. राणूची बायको म्हणाली, जा हो जा, जावून बघून तरी या पोरगी काय म्हणते ती. राणू उठला, काठी टेकीत टेकीत नाथांच्या वाड्यात येऊन उभा राहिला. आणि त्याने नाथांना सरळ जेवणाचे आमंत्रणच देऊन टाकले. नाथांनी ते तितक्याच आनंदाने कबूल केले. राणू पंख फुटल्यासारखाच आनंदाने बेहोष होऊन घरी परतला. नाथ, ठरल्याप्रमाणे राणूकडे जेवायला गेलेली....

## नाथाघरचा श्रीखंड्या

नाथांच्या ह्या अलौकिक भक्तीने पंढरीचं चैतन्य चाळवलं; आणि सगुण साकार रूपडं धरून नाथांचा संग लाभावा म्हणून पैठणात अवतीर्ण झालं. सकाळचा प्रशांत समय होता. नाथांचे चिरंजीव हरिपंत पंडीत गंगास्नान करून घाटाच्या पायऱ्या चढून वर येत होते. ही संधी साधून पंडिताला देव आडवा आला. आणि अडाण्याचं सोंग घेऊन हरिपंताला नमस्कार करीत म्हणाला.

आपण नाथ काय ?

नाही ! पंडित तुटकपणे म्हणाला.

पण नाथांचं घर आपल्याला ठावूक आहे काय ?

हो. मी त्यांचाच मुलगा....

अरे वा वा वा म्हणजे मोठे भाग्यवानच म्हणायचे आम्ही. नाथांचे नाव ऐकून दर्शनाला आलोय.

बापाचं कौतुक ऐकून मुलाच्या कपाळावर आठ्या पडल्या. पंडिताने त्या अनोळख्याला नांव विचारलं.

देव म्हणाला, अहो कसलं नांव गांव घेऊन बसलाय आमचं ?

आम्हाला ना नांव ना गांव. लोक मला बाळकृष्ण म्हणतात म्हणून आम्ही आमचं तेच नांव सांगतो सगळ्यांना. गांव असं नाहीच. जो प्रेमानं हाक मारील तीथं थांबतो. प्रेम देईल तिथं राबतो. झालं, मानत आलं नाथांच्या सावलीला रहाव म्हणून आलो. कां हो नाथ ठेवतील कां मला ?

काम काय करणार ?

म्हणाल ते !

हे बघ आमच्या वाड्यात एक हौद आहे, तो रोज कावडीनं पाणी आणून भरावा लागेल. काय, आहे कबूल ?

कबूल.... देव आनंदानं म्हणाला.

तर मग चल. असं म्हणून हरिपंतानं देवाला घरीआणलं. वडिलांना हांक मारून हरि पंडित म्हणाले....

बाबा हा बाळकृष्ण याला कोणी नाही. म्हणून आपल्याकडे आणलय याला. रोज कावडीनं पाणी भरण्याचं काम मी याला दिलंय. हा कबूल आहे. काम करील आणि आपल्याकडेच राहील.

नाथ, म्हणाले वा वा पंडित तुम्ही आज मोठंच काम केलंत, मग बाळकृष्णाकडे वळून नाथ म्हणाले.

बरं कां रे हरि पंडिताने सांगितलेलं काम करायचं. पण तूं माझं आणखी एक काम करायचं.

कोणतं ?

मला रोज श्रीखंड उगाळून द्यायचं.

श्रीखंड ?

म्हणजे आपल चंदन रे. आम्ही त्याला श्रीखंड म्हणतो. ते तूं रोज उगाळून द्यायचं. आजपासून तूं माझा श्रीखंड्या.

आणि मग हा श्रीखंड्या अहोरात्र नाथांच्या दारी राबू लागला. आपल्या भक्तांची सेवा करू लागला.

देवालाही आपल्या भक्तीने दिपवून टाकून आपली चाकरी करायला लावणाऱ्या नाथांची महती काय वर्णावी. पण नाथांच हे भाग्य पैठणच्या कुचर ओढ्याला कसं खपावं. बोलून चालून नारदाची गादी ती. त्यांनी हरि पंडिताला भडकावून दिला. आणि शास्त्राने विद्वान झालेला पंडित हरिपंत या भुलावणीला बळी पडला. पंडित घरी आला. आईशी भांड भांड भांडला. बापाला वाटेल ते बोलला. आणि पत्नीला घेऊन काशीला वास्तव्य करण्यासाठी घर सोडून निघून गेला.

मातेचं मन वेदनेनं भरून गेलं. तिला अन्नपाणी गोड लागेना. डोळ्याचं पाणी खळेना. नाथांनी तिची परोपरीने समजूत घातली; आणि एक दिवस स्वतः जावून हरिपंताला घरी घेऊन येईन असं वचन दिलं तेव्हां कुठं ती शांत झाली.

असेच कांही दिवस गेले. नाथांच्या मनात आलं, चक्रपाणीचं श्राद्ध करावं. त्यांनी श्राद्धाची सर्व तयारी केली. ब्राह्मणांना घरोघरी जाऊन निमंत्रणे दिली.

श्राद्धाचा दिवस उजाडला. भोजनाची सर्व सिद्धता झाली. पानं वाढून झाली. नाथ ब्राह्मणांची वाट पाहू लागले; पण ब्राह्मण आले नाहीत. नाथ सचिंत झाले. इतक्यात दारावर जमलेले दलित महार सुग्रास अन्नाचा वास घेत अन्नाची वाट पहात बसलेले नाथांना दिसले.

नाथांनी श्रीखंड्याला विचारले, काय करायचं रे ? ब्राह्मण तर अजून आले नाहीत. वाट पाहून मी तरी थकलो बाबा आता; आणि हे बघ दारी हे जीव अन्नासाठी तळमळत आहेत. हे ही परब्रह्मस्वरूपच की रे !

मग बसवायचं कां यांना नाथ ? श्रीखंड्या चटकन म्हणाला.

अरे पण मग ब्राह्मण कसे येणार ?

नाही आले तर नाही. त्यांचं काय घेऊन बसलाय एव्हढं. अहो त्यांची पितरं येतील.

खरं म्हणतोस तूं श्रीखंड्या.

अगदी खरं, नाथ.

मग मार हाक त्या साऱ्यांना. आणि बसव पानावर.

श्रीखंड्याने त्या साऱ्यांना हाक मारली; आणि पानावर बसविले. अनंत आत्मे जेवून तृप्त झाले.

ही गंमत बघायला दारी ब्राह्मणांची झुंबड उडाली होती. श्रीखंड्याने ते पहाताच साऱ्या पंक्तीवरून नजर फिरविली आणि महद् आश्चर्य घडले. ब्राह्मणांना आपले पितर प्रत्यक्ष भोजन करीत असलेले दिसले. प्रत्येकाने आश्चर्याने तोंडात बोट घातले.

नाथांच्या हातून कळत नकळत असे अनेक चमत्कार घडत होते. नाथांचे मन स्थिर होते. नित्याचा दिनक्रम सुरू होता. पण गिरीजाबाईंची प्रकृती ढासळली होती. उदासिनता वाढली होती. त्यांना राहून राहून हरिची आणि लाडक्या सुनेची आठवण येत होती.

आठवणीनं डोळ्यांच्या पापण्या सारख्या ओल्या होत होत्या. नाथांना आपल्या पत्नीची अवस्था बघवेना. त्यांनी तिची समजूत घातली आणि मी हरिपंताला घेऊन येतो असे सांगितले.

नाथ, त्यावेळी भागवताची रचना करीत होते. नाथांनी रचलेल्या भागवतातील कांही टीकाध्याय त्यांच्या शिष्याने काशीत नेले होते. मराठीमधल्या ह्या नाथांच्या रचना काशीच्या धर्मपीठापर्यंत येऊन पोहोचल्या. नाथांना काशीचं निमंत्रण आलं.

हा एक योगायोगच घडून आला. काशीच्या धर्मपीठापुढे नाथांच्या ग्रंथाची शलाकापरिक्षा झाली. धर्मपीठाने घेतलेल्या मौखिक प्रश्न-उत्तरात नाथांनी साऱ्यांना निरूत्तर केले. नाथांचा जय झाला. त्यांचा धर्मपीठाने मोठा सत्कार केला. हरि पंडित, नाथांचा मुलगा वडिलांच्या विद्वत्तेने दिपून गेला.

नाथ परत फिरण्याची वेळ आली. त्यांनी हरि पंडितांला त्याची आई आजारी असल्याचे सांगितले. परत फिरण्याची विनंती केली. हरिने ती कांही अटीवर मान्य केली. आणि तो पत्नीसह वर्तमान वडिलांच्या समागमे पैठणात परत फिरला.

## दासोपंत नाथ भेट

मजल दरमजल करीत बैलगाडीतून प्रवास सुरू झाला. अर्ध्या वाटेवर आल्यावर नाथ म्हणाले, ''हरि आपण आंबेजोगाई करून जाऊ या.'' तिथे दासोपंत नावाचे फार मोठे अधिकारी पुरुष राहतात. त्यांनी गीतेवर टीकाही लिहीली आहे. इतकंच काय त्यांनी पासोडीवरही एक प्रचंड ग्रंथ लिहीला आहे. त्यांची पासोडी पाहण्याची फार इच्छा आहे. दासोपंत दत्ताचे फार मोठे उपासक आहेत. त्यांचे दर्शन घेऊ आणि मग पुढे जाऊ.

हरि म्हणाला ठीक आहे. गाड्या अंबेजोगाईच्या रस्त्याला लागल्या.

दासोपंतांना लेखनासाठी दररोज एक लोटाभर शाई लागत असे. पण त्यांना त्याचा कधी अभिमान वाटला नाही. परंतु मी दत्ताचा फार मोठा उपासक आहे. मला दत्त रोज स्वप्नदर्शन देतात व मार्गदर्शन करतात याचा त्यांना फार मोठा अभिमान होता.

नाथ आले, नाथांची आणि दासोपंतांची भेट झाली. दोघेही दत्त उपासकच गप्पागोष्टी सुरू झाल्या. दासोपंतांनी विचारले आपण कोणती साधना करता ? किती करता ?

नाथांनी नम्रपणे उत्तर दिले, ''हल्ली तेव्हढं जमत नाही.'' पूर्वी स्वामींकडे असताना ध्यानधारणेत कांही काळ घालवित होतो. आता मात्र साधं सरळ लौकिक जीवन सुरू आहे.

मग दासोपंतांनी आपल्याला कसे स्वप्न दृष्टांत होतात ते सारं रसभरीत वर्णन करून सांगितलं. ते ऐकून नाथ म्हणाले भाग्यवान आहात आपण. आपलं दर्शन घडलं हे आमचं महद्भाग्य. माझी इच्छा आहे आपण या येत्या दत्तजयंतीला पैठणात यावं. आपल्या हातून माझ्या वाड्यावर दत्तजयंतीचा उत्सव साजरा करण्याची इच्छा आहे.

अवश्य, अवश्य येऊ. दासोपंतांनी नाथांचं आमंत्रण कबूल केलं. नाथ परत फिरले. आणि ठरल्याप्रमाणे दत्तजयंतीच्या आधी दोन दिवस एका भल्यापहाटे पंत पैठणात दाखल झाले. शोधत शोधत नाथांच्या वाड्यावर आले आणि आश्चर्याने थक्क झाले. नाथांच्या वाड्यावर द्वारपाल म्हणून त्यांचं दैवत साक्षात् श्रीदत्त महाराज उभे होते. पंतांना नाथांची योग्यता कळली आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा सुरू झाल्या. त्यांच्या तोंडून शब्द फुटेनासा झाला....


दासोपंतांच्या उपस्थितीत आणि अध्यक्षतेखाली नाथांच्या वाड्यात दत्तजयंतीचा उत्सव मोठ्या थाटात पार पडला. हरि पंडिताने घातलेल्या अटीप्रमाणे नाथांचे किर्तन प्रवचन आता बंदच झाले होते. नाथांचे डोळे आता निवृत्तीच्या पैलतीराला शोधूं लागले होते. त्याचवेळी नाथांना जनार्दनस्वामींनी स्वप्न-दृष्टांत दिला. स्वामी म्हणाले, नाथ तुझी फार फार आठवण येते रे आता एकट्याला कंटाळा आलाय. माझ्याजवळ लौकर ये आता.

झालं, नाथांनी समाधी घ्यायचं निश्चित करून टाकलं. समाधीची तिथीही पक्की केली. फाल्गुन वद्य षष्ठी. कारण स्वामींचा जन्म फाल्गुन वद्य षष्ठीचा. स्वामींना दत्तदर्शन झालं ती तिथीही फाल्गुन वद्य षष्ठी. स्वामींनी समाधीही फाल्गुन वद्य षष्ठीलाच घेतली. आपल्याला तंत्रदिक्षा मिळाली आणि दत्तदर्शन झाले ती हीच तिथी. बस् याच तिथीला आपणही निघायचे. नाथांनी मनाशी ठरवून टाकले आणि नाथ निरवानिरव करू लागले. आपली समाधीची तिथी नाथांनी जाहीर करून टाकली; आणि नाथ ठरल्याप्रमाणे फाल्गुन वद्य षष्ठीला स्वधामी जाण्यास निघाले. आज अनाथांचा नाथ एकनाथ त्या सर्वांना सोडून गेला होता.

प्रत्यक्ष भगवंत ज्याचे घरी कावडीनं पाणी भरत होता. त्रिभुवनपालक जगद्गुरू दत्तात्रय ज्याचेकडे द्वारपाल म्हणून उभे होते ते एकनाथ मात्र निगर्वी, निर्मोही, निरभिमानी, निरहंकारी, सदा प्रेममूर्ती, दलितमित्र म्हणून आपलं जीवन कंठीत होते. ज्या काळी स्पृश्य-अस्पृश्य भेदाभेदाची प्रचंड दरी समाजात पडली होती त्या काळी अस्पृश्यांना आपले मानून त्यांना प्रेमाने जवळ घेत होते. ही दरी मोडून काढण्यासाठी राणू महाराचं आमंत्रण स्विकारून त्याच्या घरी अतिथी म्हणून जेवायला गेले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत नाथांनी उचललेलं हे पाऊल समाजजीवनाविषयी त्यांच्या मनात असलेली तळमळ व्यक्त करणारे आहे. नाथ हे केवळ संत, सत्पुरुषच नव्हते तर ते एक उत्तम समाजसुधारक होते. द्रष्टे होते. ह्या दृष्टीने विचार करता संतमंडळीतही नाथ अलौकिक होते. अद्वितीय होते असं म्हटल्यावाचून राहवत नाही.

# ज्ञानेश्वरी : एक चिरंजीवी ग्रंथ

- एस. ए. कुलकर्णी
सांगली.




— ❖ ❖ ❖ —

*संत नामदेव ते संत तुकोबारायापर्यंत सर्व संतांनी संत ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीचा मुक्तकंठाने - परमश्रद्धेने गौरव केलेला आहे. आज ७०० वर्षे उलटली, जगात व माणसाच्या आवडीनिवडी चालीरितीत अनेक परिवर्तने झाली, अनेक राजवटी बदलल्या तरी मराठी माणसाच्या मनावरील ज्ञानेश्वरीचा प्रभाव मात्र अढळ राहिलेला आहे. अशा या अनुपम ग्रंथाची त्या ग्रंथाच्या एका उपासकाने गायिलेली ही भावगौरवगाथा -*

— ❖ ❖ ❖ —

**श्री** साईलीला नियतकालिकाच्या दसरा-दिवाळी विशेषांकासाठी मला तीन विषय संपादकांनी सुचविले. त्यातील 'मला आवडलेला पारमार्थिक ग्रंथ' हा विषय मी तात्काळ निवडला. या संदर्भात मी ग्रंथाचा उल्लेख करतो तो 'ज्ञानेश्वरी'चा. माझी खात्री आहे बहुसंख्य मराठी वाचक याच ग्रंथाचं नाव निश्चित मान्य करतील. 'ज्ञानेश्वरी' हा मराठी भाषेतील 'चिरंजीवी' ग्रंथ आहे. यावत्चंद्रदिवाकरो हा ग्रंथ चिरंजीवीच राहणार आहे, हे निर्विवाद. 'ज्ञानेश्वरी' ही भगवद्गीतेवरची अत्यंत प्रभावी टीका आहे. भगवद्गीतेवरचे टीकाग्रंथ जगद्गुरू श्री शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य आदींनी लिहिले आहेत. श्री ज्ञानेश्वरानंतरही एक-दोन टीकाकार झाले. परंतु 'ज्ञानेश्वरी' ती 'ज्ञानेश्वरी'च याबद्दल वाद नसावा.

श्री ज्ञानदेवांचा जन्म श्रावण वद्य ८ शके ११९७ रोजी झाला. (इ.स. १२७५) ज्ञानेश्वरीमध्ये अंतिम ओवी सांगते.

**'शके बाराशतें बारोत्तरें।**
**तैं टीका केली ज्ञानेश्वरें।**
**सच्चिदानंदबाबा आदरें।**
**लेखक जाला।'**

शके १२१२ म्हणजे इ.स. १२९०. याचा अर्थ ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी निवेदिली ती वयाच्या केवळ १५व्या वर्षी. हा केवढा मोठा चमत्कार आहे ! एवढ्या लहान वयात एवढं ज्ञान कसं प्राप्त झालं ! याचं उत्तर त्यांनीच या ग्रंथामध्यें परस्पर - वेगळ्या संदर्भात नमूद केलेलं आहे.

**'तसी दशेची वाट न पाहता।**
**वयसेचिया गावां न येता।**
**बाळपणीं चि सर्वज्ञता।**
**वरी लयातें॥**

**तिए सिद्धप्रज्ञेचेनि लाभें।**
**मन चि सारस्वतें दुभे।**
**मग सकळ शास्त्रें स्वयंभे।**
**निगति वाचे॥'** (अ. ६)

पूर्वजन्माची ही प्राप्त सिद्धि असंच मानावं लागेल. नामदेवांनी ज्ञानदेवांचं वर्णन करताना स्पष्ट म्हटलेलं आहे -

**ज्ञानराज माझी योग्याची माऊली।**
**तेणें निगमवल्ली प्रगट केली॥**
**गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी।**
**ब्रह्मानंदलहरी प्रगट केली॥**

**अध्यात्म विद्येचे लाविलेसे रोप।**
**चैतन्याचा दीप उजळला।**
**नाना म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी।**
**एक तरी ओवी अनुभवावी॥'**

आणखी एका अभंगांत ते म्हणतात -

**'काढुनिया गुह्य वेद केले फोल।**
**आठविती बोल मनामाजी॥'**

ज्ञानदेवांनी वेदांना मागं सारलं. ही नामदेवांची शिफारस खूप बोलकी व अर्थपूर्ण आहे. एकनाथ म्हणाले,

**'ब्रह्मसाम्राज्यदीपिका।**
**वर्णियेली गीतेची टीका।**
**विठोबाचा प्राणसखा।**
**ज्ञानोबा माझा॥'**

जगद्गुरू तुकोबाराय म्हणतात -

**'ज्ञानियांचा राजा गुरू महाराज।**
**म्हणति ज्ञानेश्वर तुम्हां ऐसे॥**
**मज पामरासी काय थोरपण।**
**पायीची वहाण पायी बरी॥'**

यावरून ज्ञानेश्वरीची श्रेष्ठता सिद्ध होते.

मी नित्य 'ज्ञानेश्वरी' वाचणारा एक सामान्य अभ्यासक. ज्ञानेश्वरीमध्यें रोज मला कांहीतरी नवीन विचार आढळतात. मन थक्क होऊन जातं. ज्ञानेश्वरी म्हणजे तत्वज्ञानाचा महामेरू, महासागर असंच म्हणावं लागेल.

**'तैसा चित्तिं अहंते ठाओ।**
**आणि जीभे सकळशास्त्रांचा सराओ।**
**ऐसेनि कोडी एकी जन्म जाओ।**
**परि न पविजे माते॥'**

मनामध्यें अहंकार असला आणि सर्व प्रकारच्या शास्त्रांचं ज्ञान अगदी जिभेवर असलं - आणि अशातऱ्हेनें कोट्यावधी (अगणित) जन्म लाभले, तरी ईश्वरी साक्षात्कार होणारच नाही. एका ओवीमध्यें सारं अध्यात्म ज्ञानदेवांनी स्पष्ट केलं आहे. हजारों ग्रंथांचं सार या एका ओवींत सामावलं आहे. हेच ज्ञानेश्वरीचं वैशिष्ठ्य !

**'भाष्यकाराते वाट पुसतु'** असे म्हणत ज्ञानदेवांनी, वेद, उपनिषदें, पुराणें, कर्मकांड, त्यांच्या मर्यादा, कुळ-वर्ण-जातीभेद, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग आदी सर्व विचारसरणीचा एक दिव्य भव्य आकाशमंडपच ज्ञानेश्वरीच्या माध्यमांतून वाचकांपुढे उभा केलेला आहे. तो इतका उत्तुंग व विशाल व्याप्तीचा आहे कीं त्यांतील प्रत्येक शब्दाने, दृष्टांताने, रूपकानें वाचक स्तिमित होऊन जातो.

**'वेदाधारें बोलति।**
**केवळ कर्म प्रतिष्ठिति।**
**परि कर्मफळं आसक्ति।**
**दाउनियां॥**

**म्हणति संसारीं जन्मिजे।**
**यज्ञादि यजन कीजे।**
**मग स्वर्गसुख भोगिजे।**
**मनोहर॥**

**जैसा कापुराचा राशि कीजे।**
**मग अग्नि लांउनि जाळिजे।**
**कां मिष्टान्नीं संचरिजे।**
**कालकूट॥**




कर्माचा बडेजाव म्हणजे कापुराचा ढीग करून तो पेटवण्यासारखं आहे; किंवा मिष्ठान्नामध्यें कालकूटासारखे जालीम वीष मिसळल्यासारखे आहे. ईश्वर प्रत्येक भूतमात्रांमध्यें आत्म्याच्या स्वरूपांत अधिष्ठित असतो; तो तसाच मानला पाहिजे याचं समर्थन करताना ज्ञानदेव म्हणतात -

**'भूतांचेनि अनेकपणें।**
**अनेक नोहे अंत:करणें।**
**केवळ एकत्व माझें जाणें।**
**सर्वत्र जो ॥**

**तऱ्हैं दीपा आणि प्रकाशा।**
**एकवंकैयेचा पाडु जैसा।**
**तो माझां ठांई तैसा।**
**मी तेयामाझि ॥'**

दिवा तिथें प्रकाश अन् प्रकाश तिथें दिवा याचप्रमाणें भूतमात्रें आणि ईश्वर यांचा घनिष्ठ संबंध आहे हे एकाच उदाहरणानें ज्ञानदेव पटवून सांगतात. इथें कुणीहि बुद्धिवादी आक्षेप घेऊच शकत नही. माणसांचे वर्ण, आकार, रंग अनेक असले, तरी अंत:करणें (भाव भावनांची) एकच असतात हे तत्त्व ज्ञानदेवांनी किती सहजपणें व प्रभावपूर्वक प्रस्थापित केलं !

कुळे-वर्ण-जातीभेद यासंदर्भात ज्ञानेश्वरीमधील विचार अत्यंत मूलगामी व प्रभावी आहेत.

**'म्हणौनि आइकैं पार्था।**
**हे वर्णभेदसंस्था।**
**मी करिता नोहें सर्वथा।**
**तें यया चि हेतू ॥'**

वर्णभेदसंस्था ही ईश्वरनिर्मित मुळीच नाही.

**'आगा कुळाचेया चोखटपणा नलगा।**
**आभिजात्यें ज्ञनें श्लाघा।**
**व्युत्पत्तीचा ही वाउगा।**
**सोसु कां वाहा ॥'** (अ. ९)

जन्म कोणत्या कुळांत झाला याला काहीच महत्त्व नाही. या मताच्या पुष्टीसाठीं ज्ञानदेवांनी एकापाठोपाठ एक समर्पक दृष्टांत दिले आहेत. केवळ कणसाला महत्त्व देण्यांत काय अर्थ आहे ? कणसांत दाणेंच नसतील तर त्या कणसाचा उपयोग काय ? मोठं सरोवर असून त्यांत पाण्याचा थेंबही नसेल, तर त्या सरोवराचा काय उपयोग ? कुळज्ञान - वैभवाचा गौरव म्हणजे शीर नसलेला देह. मनांत ईशप्रेम नसेल, ईशभक्ति नसेल अशा व्यक्तिंमध्यें आणि पत्थरामध्यें काय फरक आहे ?

**'तैसें क्षत्री वैश्य स्त्रिया।**
**कां शूद्र अंत्यादि इया।**
**जाती तंव चि वेगळालिया।**
**जंव न भजति मातें ॥**

**तंव नदानदीचीं नांवें।**
**तंव चि पूर्वपश्चिमेंचे धांवे।**
**जंव नैयंति आघवे।**
**समुद्रापासिं ॥'**

वैश्य, क्षत्रीय, शूद्र, स्त्रिया हे सारे भेद व्यक्ति ईशभक्तिमध्यें विलीन होईपर्यंत असूं शकतील. नद्या सागरास जाऊन मिळेपर्यंत, त्या पूर्ववाहिनी - पश्चिमवाहिनी, तथा कृष्णा, गोदा, गंगा या नांवानें ओळखल्या जातील; समुद्रांत नद्या विलीन झाल्यावर त्यांचे नामोनिशाणही राहात नाही.

**'आणि स्वधर्मू चि पाळावा।**
**परधर्मु तो गाळावा।**
**हा नियमु हीं पांडवा।**
**न कीजे चि पां।'**

**'तैसें धर्माधर्माचें टवाळ।**
**दावी अज्ञान मूळ।**
**तें त्यजूनि त्याज सकळ।**
**धर्मजात ॥**

**तैसा एक मी वांचौनि काहिं।**
**मग भिन्नाभिन्न आन नाहिं।**
**सोहंबोधें तेयाचां ठांई।**
**अनन्यु होयें ॥'** (अ. १८)

धर्माधर्मांतील भेद म्हणजे 'टवाळखोरी' असं ज्ञानदेव निक्षून सांगतात. या ओव्यांतील 'त्यजूनि त्यज' ही द्विरुक्ति ज्ञानदेवांचा ठामपणा व्यक्त करते. ईश्वर एकच आणि तो चैतन्य स्वरूपांत सर्वत्र अधिष्ठित असतो - हा बोध संपूर्ण ज्ञानेश्वरीमध्यें जागोजाग आढळतो. म्हणूनच हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ व वादातीत ठरलेला आहे. भेदाभेदाचे मूळ म्हणजेच 'अहंकार' असं ज्ञानदेवांनी निक्षून सांगितलेलं आहे.

**'मग मशकु हा गजु ।**
**कां श्वपचु हा द्विजु ।**
**पैल इतरु हा आत्मजु ।**
**हे उरेल कें ॥**

**ना तरि धेनु हे श्वान ।**
**एक गुरुये एक हीन ।**
**हे असो कैंचें स्वप्न ।**
**जागतेया ॥**
**एथ भेदु तरि देखावा ।**
**जरि अहंकारू उरला होआवा ।**
**तो आदीं चि नाहिं आघवा ।**
**आतां विषम काई ॥**

**म्हणौनि सर्वत्र सदा सम ।**
**तै आपण चि अद्वय ब्रह्म ।**
**हे संपूर्णता जाणैं वर्म ।**
**समदृष्ट्यांचे ॥'**

**'आतां सुऱ्हदु आणि शत्रु ।**
**कां उदासु आणि मित्रु ।**
**हा भेदाभेदु विचित्रु ।**
**संकल्पु कैंचा ॥** (अ. ६)

माशी, हत्ती, शूद्र, ब्राह्मण, आपला-परका, गाय, कुत्रा या भेदाच्या कल्पना खोटया स्वप्नाप्रमाणे असतात, आणि 'अहंकार' मनांत असेपर्यंत खऱ्या वाटतात. अहंकार समूळ नाहीसा झाला म्हणजे सर्वत्र समताच आढळते, शत्रु-मित्र हे दुजाभावही नष्ट होतात. ज्ञानदेवांची ही स्पष्ट भूमिका केवढी तेजस्वी अन् प्रभावी आहे! (भावी काळाचे चित्र कदाचित त्यांच्या डोळ्यापुढें तरळत असेल का त्यावेळीं ?)

ज्ञानदेवांचं सामाजिक निरीक्षण अपरंपार असल्याची स्पष्ट साक्ष ज्ञानेश्वरींत आढळून येते. राज्यशास्त्र, वैद्यशास्त्र, उद्योग, शेती, व्यापार, समाजजीवन, मानसशास्त्र, साहित्य, काव्य, शिल्पशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, कुटीरोद्योग, संगीत, कला, नाट्य आदि अनेक शास्त्रांचं त्यांचं अपार ज्ञान, निरीक्षण वादातीत जरूर आहे. कुठला एकहि विषय त्यांनी बाजूला ठेवला नाही.

**'जैसें भ्रमरू तरि भेदी कोडें ।**
**भले तैसें काष्ट कोरडें ।**
**परि कळिकेमाझि सांपडे ।**
**कोवळिये ॥'** (अ. १)

भुंगा लाकूड पोखरतो; पण कोवळ्या कलिकेमध्यें अडकून पडतो.

**'सलीलीं पय जैसें । एक होउनि मिनलें असें ।**
**परि निवडूनि राजहंसें ।**
**वेगळें कीजे ॥**

**का अग्निमुखें कीडाळ ।**
**तोडूनियां चोखाळ ।**
**निवडीति केवळ ।**
**बुद्धिमंत ॥'** (अ. २)

राजहंस दूध-पाण्याचे पृथक्करण करतो; सोनार सोनं तापवून हिणकस वेगळा काढतो व चोख सोनं निवडतो. (प्राणीशास्त्र; उद्योग)


**'जैसा निर्वातिचा दीपु ।**
**सर्वथा नेणे कंपु ।**
**सांघे पैलतीरा जावें ।**
**ऐसे व्सन जेथ पावे ।**
**तेथ नावेतें त्यजावें ।**
**घडे केवि ॥**

**ना तरि तृप्ति इच्छिजे ।**
**तरि कैसेनि पाकु न कीजे ।**
**कां सिद्ध ही न सेविजे ।**
**केवि सांधे ॥'** (अ. ३)

कर्म अटळ आहे या संदर्भात दृष्टांत आहेत - नदीच्या पैलतीराला जायचे असेल, तर मी नावेंत बसणार नाही असं म्हणतां येत नाही; भूक लागली असतां स्वयंपाक करणार नाही असं म्हणता येत नाही; किंवा स्वयंपाक तयार असतां मी जेवणार नाही असं म्हणता येत नाही. (जीवनशास्त्र)

**'जैसा पंचमालापु सुगंधी ।**
**किं परिमळु आणि सुस्वादु !'** (अ. ४)

**'कां बहिराचे अस्थानी ।**
**कवणें गीतांतें हान मानी ॥'** (अ. ४)




(संगीतशास्त्र - पंचम सूर व संगीताचा बहिऱ्यापुढें उपयोग नाही.)

**'जेंसाहित्य आणि शांति।**
**हे रेखा दिसे बोलती।**
**जैसी लावण्यगुणयुवती।**
**आणि पतिव्रता॥'** (अ. ४)

(साहित्य व सौंदर्यशास्त्र - सुंदर तरूणी आणि गुणवान पतिव्रता असं साहित्य असावं.)

**'जेथ हें संसारचित्र उमटे।**
**तो मनोरूप पट फाटे।**
**जैसा सरोवर आटे।**
**मग प्रतिमा नाहीं॥** (अ. ५)

(मनाच्या पडद्यावरचे संसारचित्र, कोरड्या सरोवरांत प्रतिबिंब दिसणार नाही - भौतिकशास्त्र)

**'जेथ अमृताचे नि पाडें।**
**मुळां ही सकट गोडें।**
**जोउति दाटें झाडें।**
**सदा फळतिं॥'** (अ. ६)

तपसाधनेला योग्य स्थळ कोणतें याचं विवेचन करताना ज्ञानदेवांनी नैसर्गिक सौंदर्याचं जे वर्णन केलेलं आहे, ते कविजनांना मोहवून सोडेल इतकं प्रभावी व बहारदार आहे. दाट झाडी असावी, खळखळणारे निर्झर असावेत, संपूर्ण एकांत असावा; श्वापदांची वर्दळ नसावी, हंस-सारस असे पक्षीराज असावेत, कोकिळेचा सुस्वर ऐकता यावा - वगैरे.

**'आहारू तरि सेविजे।**
**परि युगति घेनि मापें मविजे।'** (अ. ६)

(आहार माफक असावा, बोलणं माफक, मंद मंद चालणं, निद्रेला अवसर, जाग्रण माफक असावं - तपोसाधना करणाऱ्या साधकासाठीं वैद्यशास्त्रानुसार केलेल्या पथ्यपाण्याच्या ह्या सूचना मौलिक आहेत.) त्या सर्वसामान्यांनाही लागू आहेत.

**'जें दैन्याचें दूभतें।**
**जें महाभयाचें वाढलें।**
**जें सकळ दु:खाचें पुरतें।**
**भांडवल गा॥** (अ. ८)

संसाराचे वर्णन करताना ज्ञानदेवांनी ओवीचा आरंभ 'जें' या सर्वनामानें करून १० ओव्यां निवेदिल्या आहेत - संसार म्हणजें पारध्याची भूलभलावण, विंचवाचें पेव, वाघाची साऊली, वेश्येची मैत्री, काळसर्पाचं नरम अंग वगैरे - हे साहित्य रचनेचे वैशिष्ट्य आहे ज्ञानदेवीचं. माहेर श्रीमंत असलं कीं स्त्रीच्या इच्छा पूर्ण होतात (अ. ९), बाळ बोबडं बोलतं - त्याचं मातेला कौतुक वाटतं - (कुटुंबजीवन) पृथ्वी सृष्टाला तथा दुष्टालाही आपल्या अंगावर वावरू देते, पाणी गायीची तथा वाघाची तहान भागवते, दिवा मालकाघरीं तथा इतरत्रही प्रकाशच देतो, झाड लावणाऱ्याला व तोडणाऱ्याहि साऊली देतं, ऊस लावणी करणाऱ्या व तोडणाऱ्यालाही गोड लागतो - समभावनेबद्दल १२व्या अध्यायांत भरपूर ओव्या आहेत (सर्व शास्त्रांचा इथे समावेश आहे.)

**'वधुवरांचिये मीळणी।**
**जसिं वऱ्हाडियां हिं लुगडी लेणीं।'** (संसार जीवन)

पाण्याचा ओघ वाकडातिकडा असला तरी पाणी स्वच्छ व गोडच असते (अ. १३); भोपळ्याच्या वेलीला विविध आकाराची फळें लागतात; पण वेलीचें बीज एकच असते (अ. १३) - तसा परमेश्वराचा एकच आधार असतो. मिठाचा हत्ती करून समुद्रांत सोडला तर तो परत येत नाही, आगीच्या शलाका भुर्रकन उडून अंतराळांत जातात - परत येत नाहीत. या दृष्टांताच्या आधारानें पुनर्जन्ममुक्त ज्ञानी व्यक्तिचं वर्णन अ. १५ मध्यें आहे. (भौतिकशास्त्र) भ्रमर कमळावर हळुवार पाय ठेवतो व परागाला ईजा करीत नाही,

**'पुढां स्नेह पांझरे।**
**मागा चालति अक्षरे।**
**शब्दु पाठिं अवतरें।**
**कृपा आधीं।'**

वगैरे काया-वाचा - मानसिक अहिंसेचं वर्णन १३व्या

अध्यायांत आहे. शेतकरी पेरलेलं बियाणं वायां जाऊं नये म्हणून त्यावर अलगद झांकण ठेवतो, कुलीन तरूणी आपले अवयव वस्त्राआड नेहमी लपवते आदि वर्णन 'शुचुता' संदर्भात खूप विस्तारानं केलेलं आढळतं. (अ. १३)

**'पतिपुत्रातें आलंगि।**
**एकचित्ते तन्वंगि।**
**परि पुत्राचिया आंगी।**
**न लगे कामु॥'**

स्त्रीने मुलाला दिलेल्या आलिंगनांत वासना असत नाही. (संसार जीवन) अशाप्रकारे 'बहुरत्नानि वसुंधरा' या उक्तिप्रमाणें ज्ञानेश्वरी म्हणजे रत्नभांडार आहे! किती म्हणून ही रत्नें वेचावीत गोविंदानं कुबेराला जे धन दिलं ते चुकते करताना - ईश्वराच्या वरदानानें मिळालेलं धन मोजता मोजता कुबेर थकून झोपला - तसं ही रत्ने वेचणारा थकूनच जाईल - एवढी व्यापकता आहे ज्ञानेश्वरीची.

ज्ञानदेव व त्यांची भावंडे बालवयांतच पोरकी - अनाथ झाली, ब्रह्मवृंदांनी त्यांचा खूप छंळ केला, भाकरीच्या तुकड्यासाठीं त्यांना माधुकरी मागावी लागली - असा छळवाद सोसूनही ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीमध्यें एकही कडवट शब्द वापरला नाही. जास्तीत जास्त 'मूर्ख' हा शब्द, तोहि क्वचित आलेला आहे. तुकाराम म्हणतील -

**'तुका म्हणें ऐशा नरां।**
**मोजोनि माराव्या पैजारा॥'**

मला ज्ञानेश्वरीचं हे वैशिष्टय फार भावतं आणि ज्ञानेश्वरी वाचताना माझा कंठ दाटतो - डोळें पाणावतात. पौर्णिमेच्या शीतल चंद्रकिरणासारखे सोज्वळ शब्द, मोत्यांच्या माळेप्रमाणें शोभणारी काव्यरचना, सांगितिक लय ही ज्ञानेश्वरीची वैशिष्टये आहेत.

**'बोलणेही न बोलोनि।**
**तें बोलिजे तोंड भरूनी।**
**जाणिवे नेणोनि।**
**जाणिजे तो॥'**

अशी शब्दजोड ज्ञानदेवांची खासियत आहे.

आजवर अनेक विद्वानांनी ज्ञानेश्वरीचं समीक्षण केलेलं आहे. परंतु ते सारं अपुरंच आहे. आकाशाचं मोजमाप कोण घेऊं शकेल ? समुद्राचा तळ कसा गांठता येईल ? अशी व्यापकता - महानता आहे ज्ञानेश्वरीची. दासोपंतांनी गीतेवर सव्वा लाख ओव्या लिहिल्या. त्याचा त्यांना गर्व होता. ज्ञानेश्वरींत केवळ नऊ हजार ओव्या असूनही ज्ञानदेवांचा एवढा गौरव का - माझा का नाही असं पंतांना वाटत होतं. तेंव्हा एकनाथांनी ज्ञानेश्वरीतील प्रथम अध्यायांतल्या केवळ दोन ओव्यांवर - ('ओम नमोजि आद्या') संत दिवस प्रवचन पंतांना ऐकविलं; तरी पण विवरण संपलं नाही. तेंव्हा नाथ पंतांना म्हणाले, ''मी संपणार, तुम्हीसंपणार पण ओवी संपणार नाही प्रवचनाच्या दृष्टीने''. ज्ञानेश्वरीच्याओव्यांची व्यापकता अशी अगाध, अप्रतिम व अनमोल आहे. कांही मंडळींनी टीका केली आहे - 'ज्ञानदेवांना गीता समजलीच नाही.' अशी विधानें करणाऱ्यांना एकच उत्तर देता येईल - 'आपल्याला ज्ञानेश्वरीचा 'पत्ता' हि लागलेला नाही; समजण्याचा प्रश्न तर दूरच आहे !'

वाचकमित्रहो, ज्ञानेश्वरी हा माझाअत्यंत आवडीचा ग्रंथ. त्यावर लिहावं तितकं थोडंच आहे. अतिशय अमर्याद, अगाध, अप्रतिम, अनमोल अशी 'साहित्य सोनियाची खाण' म्हणजे 'एकमेव ज्ञानेश्वरी'. ज्ञानदेवांनीआपलं निरुपण संपवितांना या वाग्यज्ञाला प्रसाद मागितला - 'पसायदान'. त्यांत त्यांनी स्वत:साठीं कांहींही मागितलं नाही. मागितलं तें -

**'जें खळांची व्यंकटी सांडो।**
**तयां सत्कर्मी रति वाढो।**
**भूतां परस्परें जडों।**
**मैत्र जीवाचे॥**

**दुरितांचे तिमिर जाओ।**
**विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।**
**जें जें वांछिल तें तें लाहो।**
**प्राणिजात॥'**

समस्त मानवी वंशावर-समाजावर ज्ञानदेवांनी 'माते'प्रमाणे निव्याज्य प्रेम केलं; म्हणून तर ज्ञानदेवांचा उल्लेख 'माऊली' या शब्दानेंच केला जातो. या माऊलीच्या मांडीवर मस्तक ठेवून तिची विचारधारा श्रवण करीत करीतच शेवटचा श्वास घ्यावा - हीच माझ्यासारख्या सामान्य बालकाची अंतिम इच्छा ! ज्ञानेश्वरी वाचीत असता, मातेचा प्रेमळ हात फिरतो आहे, ती गुलुगुलु आपल्याशीं बोलते आहे असा मला नेहमीच आनंद वाटतो. ज्यांना तो आनंद अनुभवायचा असेल त्यांनी 'ज्ञानेश्वरी' वाचली पाहिजे नित्य !

## सहस्त्रदीपे कैसी प्रकाशली प्रभा

# भागवत धर्ममंदिराचा आधारस्तंभ : नाथभागवत

- विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक, श्री साईलीला)



— ❖ ❖ ❖ —

*संत ज्ञानेश्वर - संत नामदेवानंतर अवतरलेल्या अंधारयुगातून मराठी संस्कृतीला नवचैतन्य प्राप्त करून देणारा प्रज्ञा-प्रतिभेचा महासंगम म्हणून संत एकनाथांच्या कार्याचा करावा तेव्हढा गौरव थोडा आहे. 'नाथभागवत', 'भावार्थ रामायण', 'भारूडे' असे एकापेक्षा एक सतेज दीप त्यांनी प्रज्वलित केले आणि त्याऱ्या दशदिशा उजळून टाकल्या.*

— ❖ ❖ ❖ —

### प्रास्ताविक

**'हे** महाराष्ट्राचे खरे **नाथ** होत' अशा शब्दात न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या प्रकांड पंडीत व अधिकारी व्यक्तीने ज्यांच्या कार्याचा गौरव केलेलाआहे ते **संत एकनाथ** महाराष्ट्राच्या संतमालेतील एक पैलूदार हिरा आहेत. संत ज्ञानदेव व संत नामदेवानंतरच्या अंधारयुगातून महाराष्ट्र संस्कृतीला नव संजीवनी देणाऱ्या एकनाथ महाराजांना महाराष्ट्रातील सांस्कृतिक पुनरुत्थानाचे अग्रणी मानले जाते. संत तुकाराम व संत रामदास यांच्या काळात स्थापन झालेल्या शिवस्वराज्याला अनुकूल असे जनजागरणांचे-क्षत्रियत्व जागृतीचे कार्य संत एकनाथांच्या काळात झाले. नाथ निखळ पारमार्थिक अधिकारी; साक्षात्कारी संत होतेच पण त्याचबरोबर त्याची समाजसन्मुखता विशेष लक्षणीय होती. ध्यानधारणा-भजन-पूजन नामस्मरणाच्या गाभाऱ्यात स्वत:स कोंडून घेऊन देशकालस्थितीकडे पाठ फिरवणाऱ्या पलायनवादी पारमार्थिकांपेक्षा नाथांचा परमार्थ वेगळा व समाजाभिमुख होता. सद्गुरू जनार्दनाच्या कृपेने त्यांनी जनतेतील जनार्दन चांगलाच जाणला होता. ही सामाजिक जाण व काळसापेक्ष परिस्थितीचे नेमके भान हेच नाथांच्या संतत्वाचे वेगळेपण होते म्हणूनच 'महाराष्ट्राचे खरे **नाथ** अशा बिरूदावलीने त्यांच्या कार्याची नोंद इतिहासाने केलेली आहे.

'संतकृपा झाली' या भागवतधर्मावरील रूपकात्मक अभंगात संत ज्ञानदेवांचा **'ज्ञानदेवे रचिला पाया'** तर संत तुकाराम महाराजांचा **'तुका झालासे कळस'** असा गौरव केलेला आहे, याच अभंगात संत नामदेवांना **किंकर** म्हणून भूषणावले असून संत एकनाथांच्या कार्याचे **'खांब दिला भागवत'** या चरणाने वर्णन केलेले आहे. हा नाथकार्याचा गौरव नाथांच्या व्यापक कार्याचा यथार्थपणे परिचय करून देणारा आहे.

### नाथ : ज्ञानदेव-नामदेवांचा गुणसंगम

संत ज्ञानदेवांची चिंतनशीलता व संत नामदेवांची प्रचार-शिलता याचा नाथ महाराजांना वारसा लाभला होता. नाथांच्या व्यक्तिमत्वात वरील दोन्ही गुणांचा समन्वय झालेला होता. त्यामुळेच नाथांच्या वाङ्मयात चिंतनाची डूब आहे तशीच सर्वजनसुलभ प्रचारात्मकतेची उबही आहे. नाथ हा ज्ञानाचा व नामाचा प्रयाग संगम आहे. ज्ञानदेवांसारखी परिणत प्रज्ञा व प्रतिभा आणि नामदेवासारखी वर्णनात्मक, रंजक व कथारूप शैली आपणास एकनाथांच्या वाङ्मयामध्ये दिसून येते. ज्ञानदेव व नामदेवांच्या एक पाऊल पुढे जाण्याचा मान एकनाथांना द्यावा लागतो तो लोकवाङ्मयकार म्हणून ! भारूड हा प्रकार नाथांपूर्वीही फार वर्षे प्रचलित होता पण 'भारूड' म्हटलं की आठवतात ते फक्त एकनाथ. कारण त्यांच्या भारूडाची संख्या, त्यांचे वैचित्र्य, व्यापकत्व आणि त्यांचा ठसठशीतपणा व अध्यात्मबोध हे होय !

एकनाथ महाराजांनी विपुल वाङ्मय निर्माण केलेले आहे. नाथांच्यावाङ्मयाची विपुलता व विविधता थक्क करणारी आहे. गुरू जनार्दनस्वामींच्या आज्ञेवरून नाथांनी 'चतु:श्लोकी भागवत' या ग्रंथाची त्र्यंबकेश्वर क्षेत्री रचना केली. त्यांच्या प्रज्ञेचा-प्रतिभेचा

हा प्रथमोन्मेष असून नाथांच्या सर्व गुणवैशिष्ठ्याचे त्यातून आपणास दर्शन घडते. श्रीमद् भागवताच्या एकादशस्कंधावरील नाथांची मराठी टीका **'नाथ भागवत'** म्हणून मराठी भाषिकांमध्ये लोकमान्य असून त्यांचे **'भावार्थ रामायण'** अगदी खेड्यापाड्यात आबालवृद्धांच्या भक्तीभावाचा विषय ठरलेले आहे **'नाथभागवत'** व **'भावार्थ रामायण'** या प्रचंड ग्रंथ लेखनाबरोबरच नाथांनी **'हस्तामलक'**, **'शुकाष्टक'** वात्मसुख, आनंदलहरी, गीतासार, चिरंजीवपद, गीतामहिमा, इत्यादी अध्यात्मिक स्फुट प्रकरण लेखनसुद्धा केलेले आहे. त्यांचे **'रूक्मिणी स्वयंवर'**, 'पौराणिक आख्यान काव्यं' ही कथारूपं असून त्यांनी लिहिलेली संतचरित्रे मोठी रसाळ व भक्तीबोधाने भरलेली आहेत.

## नाथांचे मराठी भागवत

संस्कृत वाङ्मयातील 'प्रस्थानत्रयी'प्रमाणेच वारकरी विचारधारेमध्ये संत ज्ञानदेवांची **'ज्ञानेश्वरी'**, नाथमहाराजांचे **'भागवत'** आणि संत तुकाराम महाराजांची **'अभंगगाथा'** या ग्रंथांना प्रस्थानत्रयी मानले जाते. यावरून महाराष्ट्रातील भागवतधर्मिय भाविकांमधील नाथांच्या भागवताचे अढळ स्थान लक्षात येते.

श्रीमद् भागवत हा श्रीमद् भगवतगीतेप्रमाणेच एक अमूल्य ग्रंथ असून गीता हे श्रीकृष्णाचे तत्वज्ञान तर भागवत हे श्रीकृष्णाचे चरित्र मानले जाते. एक ग्रंथ कृष्णाचा **विचार** आहे तर दुसरा ग्रंथ कृष्णलीला म्हणजेच **आधार** आहे. दोन्हीचा समान धागा **भक्ती** हा आहे. गीतेमध्ये सांख्य-योग-कर्म-ज्ञान सारे असले तरी भक्तीप्रधान विषय आहे; तर भागवत कृष्णलीलांचे गुणवर्णन असून भक्ती हेच त्या ग्रंथाचे मुख्य अधिष्ठान आहे. गीता हा श्रीकृष्ण-अर्जुन संवाद आहे तर भागवत (नाथकृत) हा श्रीकृष्ण-उद्धव संवाद आहे.

ज्ञानेश्वरीची ओवी संख्या सुमारे नऊ हजार आहे (याबद्दल मतभिन्नता आहे). तर एकनाथ महाराजांच्या भागवताची ओवी संख्या तिच्या दुप्पट, सुमारे १८,००० एवढी प्रचंड आहे. संस्कृत श्रीमद् भागवत ग्रंथाच्या एकादशस्कंधावरील नाथांची ही टीका, ज्ञानेश्वरांच्या गीता टीकेप्रमाणेच विद्वजन मान्य झाली असून नाथांच्या या टीकालेखनावर संत ज्ञानदेवांच्या टीकालेखनाचे स्पष्ट प्रतिबिंब दिसून येते. 'ज्ञानेश्वरी समजून घ्यायची असेल तर आधी नाथांचे भागवत वाचले पाहिजे' असे अनेक अधिकारी अभ्यासक-उपासक सांगतात यावरून नाथभागवत आणि ज्ञानेश्वरीतील भक्तीतत्त्व प्रतिपादनाची एकरूपता लक्षात येते. वारकरी संप्रदायामध्ये **'ज्ञानाचा एका'** व **'नामाचा तुका'** अशी संतदुकुली मानली जाते. यावरूनही ज्ञानदेव-एकनाथ आणि नामदेव-तुकाराम यांच्यातील भावबंध लक्षात येतात. नाथांच्या स्वप्नात **ज्ञानदेव** येणे व तुकारामांच्या स्वप्नात **नामदेव** येणे या गोष्टींचा अर्थही वरील भावबंध स्पष्ट करणारा आहे.

नाथमहाराजांचा एक अभंग आहे - **श्री ज्ञानदेवे येऊनि स्वप्नात । सांगितली मात मजलागी ।** या अभंगातील अखेरच्या चरणात नाथ महाराज म्हणतात -

**एका जनार्दनी पूर्वपुण्य फळले ।**
**श्रीगुरू भेटले ज्ञानेश्वर ॥**

अशाप्रकारे नाथ ज्ञानदेवांना गुरू मानत होते. त्यामुळे गुरूचा शिष्यावर प्रभाव व परिणाम दिसणे अगदी सहज व स्वाभाविक आहे आणि तसा तो नाथभागवतावर आपणास पदोपदी जाणवतो. याबद्दल संतवाङ्मयाचे समर्थ लेखक कै. शं. गो. तुळपुळे म्हणतात - **''तात्त्विकदृष्ट्या एकनाथी भागवत ही श्रीमद्-भागवतावरील टीका आहे हे खरे. पण सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास ते ज्ञानेश्वरीवरील विस्तृत भाष्य आहे असेच कोणासहि वाटेल. किंबहुना तो ज्ञानेश्वरीचाच अवतार आहे.''** (पाच संतकवि पान २०६). तसेच तुळपुळे पुढे म्हणतात - **''परिस्थितीने उत्पन्न झालेले भेद वगळले तर ज्ञानेश्वरी आणि नाथभागवत हे दोन ग्रंथ अगदी एकरूप वाटतात. एका दिव्यावर दुसरा दिवा लावावा तशांतील हा प्रकार आहे.''**

## ज्ञानदेवांचा प्रभाव

मराठीतील एक ज्येष्ठ संशोधक कै. न. र. फाटक यांचा पुढील अभिप्रायसुद्धा कै. तुळपुळेंच्या मतास दुजोरा देणारा आहे. श्री. फाटक म्हटतात - **''ज्ञानेश्वरीचा अर्थ व पाठ लावण्याला एकनाथांची भागवत टीका उपयोगी पडावी इतकी सादृश्ये या दोन ग्रंथात आहेत. भागवतावर टीका लिहिताना त्यांच्यासमोर ज्ञानेश्वरीचा कित्ता सर्व बाबतीत होता. ज्ञानेश्वरीतील दृष्टांत, कल्पना, विचार, वर्णनशैली या सर्वांचा त्यांनी आपल्या भागवत टीकेत यथेच्छ आदर केलेला आहे.''** संत साहित्याचे आणखी एक साक्षेपी अधिकारी श्री. ह. श्री. शेणोलीकर आपल्या 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप'मध्ये म्हणतात - **''ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाच्या आधाराने भागवतधर्मासंबंधी केलेले सोपपत्रिक व सविस्तर व्याख्यान म्हणजे 'नाथ भागवत' असे या ग्रंथातील आशयाबद्दल म्हणता येईल.''**

नाथावरील ज्ञानदेवांच्या या प्रभावाबद्दल वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू वै. धुंडामहाराज देगलूरकर म्हणतात - **''गीता व भागवत हे दोन भागवतधर्माचे प्रेरक ग्रंथ. ज्ञानदेवांनी गीतेवर टीका करून एक ग्रंथ मराठी माणसांपर्यंत नेऊन पोहचविला. त्यांचेच उरलेले कार्य जणू भागवतातील तत्त्वज्ञानप्रधान अशा एकादशस्कंधावर टीका करून एकनाथांनी पूर्ण केले. त्यातही**

**एकनाथांनी दोन गोष्टी साधलेल्या दिसतात. एकनाथांचा हा ग्रंथ एकादशस्कंधावर तर टीका आहेच पण जाणकारांना हेही माहीत आहे की, ती ज्ञानेश्वरीवरील टीकाही आहे. अभेदभक्तीचे तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरीचेच स्पष्टीकरण करीत एकनाथांनी नाथभागवतात मांडले आहे असे वाटावे, इतके साधर्म्य या दोन ग्रंथात आहे.''** (श्री ज्ञानेश्वरी नवदर्शन, पान ५३०)

संत साहित्याकडे अधिक चिकित्सकपणे पाहणारे ज्येष्ठ विचारवंत कै. गं. बा. सरदार 'एकनाथदर्शन'च्याप्रस्तावनेत म्हणतात - **''ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माला तात्त्विक बैठक मिळवून दिली. पण त्यांच्या साहित्यात प्रामुख्याने आदर्श व अपार्थिव अशा स्फूर्तिप्रद ध्येयसृष्टीचे आल्हाददायक चित्रण आहे. हा उज्ज्वल जीवनादर्श आपल्या आचारधर्मात व लौकिक व्यवहारात कसा उतरवता येईल याचे एकनाथांनी सांगोपांग दिग्दर्शन केलेले आहे.''**

## नाथ भागवताचा काशीत गौरव

संत एकनाथाचा अवतारकाळ शके १४५५ (इ.स. १५३३) ते शके १५२१ (इ.स. १५९९) असा होता. अर्थात त्यांच्या जन्मशकाबद्दलही वाद आहे. भानुदास-चक्रपाणि-सूर्यनारायण अशा कुळपरंपरेत नाथांचा जन्म झाला. प्रसिद्ध संत भानुदासाचे ते पणतू होत. संत ज्ञानदेवांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी श्रीमद्भागवतावर मराठीत टीका लिहिण्याचा श्रीगणेशा केला. या ग्रंथाची पंचाध्यायी पूर्ण होताच काशीच्या ब्रह्मवृंदाच्या आदेशावरून नाथांना काशीक्षेत्री जावून पंडितांशी वादविवाद करावा लागला. नाथांची बुद्धिमत्ता-विद्वत्ता आणि त्यांचा युक्तीवाद व मराठी टीकेचा श्रेष्ठ दर्जा पाहून काशीच्या पंडितांनी अखेर त्यांच्या मराठी टीकेस संमती दिली. पुढे त्यांनी काशी येथेच वास्तव्य करून मणिकर्णिका घाटावर गंगानदीच्या पावन सान्निध्यात 'नाथभागवत' ग्रंथ पूर्ण केला. सुमारे शके १४९२ ते १४९५ या काळात हा टीका ग्रंथ लिहिला गेला आणि या ग्रंथाची श्रेष्ठता लक्षात घेऊन काशीतील पंडितांनी नाथमहाराजांचा गौरव केला व ग्रंथाची हत्तीवरून मिरवणूक काढली. एका मराठी माणसाचा-एका मराठी ग्रंथाचा हा गौरव अवघ्या मराठी भाषिकांचे भूषण ठरलेला आहे.

नाथांचा मुलगा हरिपंडित हा सुद्धा एक नामवंत संस्कृत पंडित होता. आपले वडिल संस्कृत श्रीमद्भागवतावर मराठी भाषेत टीका लिहित आहेत, हे समजल्यावर हरिपंडित पैठण सोडून श्रीक्षेत्र काशीस निघून गेला. या पुत्रवियोगाने ना नाथ दुःखी झाले, ना विचलित झाले. त्यांनी आपले टीका लेखनाचे अंगीकृत कार्य स्थितप्रज्ञाप्रमाणे पुढे चालू ठेवले. काशीतील पंडितांनी नाथभागवताची हत्तीवरून काढलेली मिरवणूक पाहून हरिपंडिताचे डोळे उघडले व आपल्या वडिलांचे खरे मोठेपण त्यास समजून आले. अशाप्रकारे 'नाथभागवत' ग्रंथामागे इतिहास असून नाथांच्या ऐतिहासिक कार्यातील एक सोनेरी पर्व म्हणून या कार्याचा करावा तेव्हढा गौरव थोडा आहे.

नाथभागवताचा खरा गौरव, नाथांचे गुरू जनार्दनस्वामी यांच्या '**तुझा बोलुचि एक एकु । सोलीव विवेकाचा विवेकु ॥**' या आशीर्वादात्मक उद्गारात आहे.

एकनाथपूर्व काळातील मराठी वाङ्मय एका ठराविक वळणाचे होते. नाथांनी अनेक नवे प्रवाह मराठी वाङ्मयात आणून त्यांना लोकमान्यता प्राप्त करून दिली. **''ज्ञानदेव - नामदेवांचा काळ हा मराठी साहित्याची बाल्यावस्था होय तर नाथांच्या काळात मराठी भाषेला प्रौढत्त्व प्राप्त होऊन सहजस्फूर्तीवर विसवून न राहता योजनापूर्वक ग्रंथलेखन करण्याचे युग अवतरले होते. चालीस चालीस हजार ओव्यांचे प्रचंड ग्रंथ लिहिले जात होते. एवढी प्रदीर्घ रचना पेलण्याचे सामर्थ्य मराठीत आले होते.''** ही गं. बा. सरदार यांनी नाथकाळाची केलेली समीक्षा नाथांचे प्रभावी कार्य स्पष्ट करणारी आहे. दृष्टांत ही ज्ञानदेवांची तर रूपक ही नाथांची मराठी साहित्याला लाभलेली देणगी आहे असे म्हणतात. यावरून नाथांची बहरदार रूपके व त्या रूपकांचे श्रेष्ठत्व लक्षात येते.

नाथांच्या नंतर झालेले संत तुकाराम व संत रामदास हे दोन संत, नाथांच्याच तत्त्वांचे दोन वेगळ्या मार्गाने प्रतिपादन करणारे दोन प्रचारक होत. असे मत डॉ. शं. गो. तुळपुळे, ह. श्री. शेणोलीकर आदी ज्येष्ठ अभ्यासकांशी सप्रमाणे प्रतिपादन केलेले आहे. यावरूनही नाथांच्या कार्याचे महत्त्व कळून येते.

'नाथभागवत' या त्यांच्या ग्रंथास '**महाराष्ट्रीय भागवत धर्माचा पाया**' अशा शब्दात गौरविले जाते यावरून नाथभागवताची एकूण महत्ता आपल्या लक्षात येते. **''संतांचे ग्रंथलेखन अभंग लेखन हे कार्य केवळ त्यांच्या अत्युत्कट भगवद्भक्तीचा सहजोद्रेक नव्हता; तर वस्तुतः ती धार्मिक प्रबोधनाची एक मोठी चळवळ होती.''** ज्येष्ठ समीक्षक विचारवंत गं. बा. सरदार यांनी संतांच्या कार्याचे केलेले हे वर्णन संत एकनाथांच्या कार्यासही अनुलक्षून असून प्रबोधन चळवळीचे नाथ हे अग्रणी होते कारण ज्ञानदेव-नामदेवांच्या कार्याला त्यांनी खऱ्या अर्थी पुन्हा चालना दिली आणि अंधारयुगातून मराठी भाषेला व मराठी जनताजनार्दनाला त्यांनीच 'भागवत', 'भावार्थ रामायण', 'भारूडे' असे एकापेक्षा एक सतेज दीप प्रज्वलित करीत उजळून टाकले. मराठी संस्कृतीला नवचैतन्य प्राप्त करून दिले.

**सहस्त्रदीपे कैसी प्रकाशली प्रभा ।**
**उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा ॥**

# दासबोध : समर्थांचा दिव्य संदेश

- कृष्णा तेली
कुडाळ.

— ❖ ❖ ❖ —

*संसारमय जीवनातील स्थूल दृष्टीच्या जागी भगवंतमय सूक्ष्म दृष्टी जोपासावी हा संदेश आज मानवाला मोक्ष प्राप्त करून देणारा ठरेल म्हणून दासबोध हा ग्रंथराज म्हणावा लागेल हे निर्विवाद सत्य आहे.*

— ❖ ❖ ❖ —

महाराष्ट्रात प्रापंचिक तसेच परमार्थिक असो, त्याला समर्थ रामदासस्वामी कोण होते असे विचारले तर त्यांची ओवीबद्ध रचना म्हणून तो ओळख करून देईल. महाराष्ट्र धर्म वाढवावा ! असा उपदेश करणारे समर्थ अध्यात्म, राजकारण या दोहोतही अग्रेसर संतपुरुष होऊन गेले असेच म्हणावे लागेल.



**दासबोधी समर्थ निवास ।**
**ग्रंथी वरदान निजध्यास ।**
**निजध्यासेचि प्रत्ययास ।**
**येत ग्रंथस्वरुपे ।।**

'दासबोध हे अखिल संसारी व परमार्थियांना लाभलेले लेणे आहे. प्रत्यक्ष श्री समर्थांचा सहवास लाभणे शक्य व्हावे एवढी निश्चित प्रचिती दासबोध आपणास अनुभवास आणेल - मात्र एकाग्रता व मननशिलता हवी. विवेकाच्या जोरावर माणूस अंत:करणाने विशाल बनून आत्मज्ञानी बनू शकतो, असा स्पष्ट निर्वाळा श्री समर्थांनी साधकांना दिला आहे. सामान्य माणसाला देव हवा असतो परंतु प्रपंच व पैशाला धक्का न लावता तो हवा असतो. म्हणून प्रपंचाची घडी न बिघडवता माणसाने देवाचे दर्शन कसे घ्यावे याचा सरळ राजमार्ग दासबोधात सांगितला आहे.

दासबोधात असे स्पष्टपणे सूचित करण्यात आले आहे की, आपला समाज दोन मुख्य कारणामुळे मागे पडला. एक - नीट विचार न करणे अर्थात अविवेक व दोन - प्रयत्न न करणे अर्थात् आळस. अविवेकाला समर्थांनी अज्ञान म्हटले आहे म्हणून ज्ञानी बनून माणसाने विवेक वापरावा असे दासबोध सांगतो तसेच आळस सोडून प्रत्येकाने उदंड कष्ट अनुसरावे असे वारंवार सांगत आहे. दासबोध वाचला व अभ्यासिला तर अज्ञान, दु:ख व भ्रांति नाश पाऊन लगेच वैराग्य अंगी बाणेल. त्याला विवेकाची जोड मिळेल व बद्ध मुमुक्षु होतील, मूर्ख दक्ष होतील, अभक्त भक्त होतील व सत्वर मोक्ष पावतील. नाना दोष जाऊन पतित पावन होतील. देह बुद्धीमुळे होणारे धोके नष्ट पावतील. सर्वांगिण अधोगती चुकेल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मनाला खरी विश्रांती मिळून अत्यंत समाधान लाभेल.

स्वस्थपणे पाहिल्यास, ईश्वर शिव दिसतो व तोच ईश्वर गतिमान झाला की शक्ती म्हणून अनुभवास येतो. म्हणून ज्याला जे पहावयाचे आहे त्याने स्वत: तेच होऊन पहावे असा दासबोध

सांगतो. विश्वाचा कारभार बिनबोभाट चालविणारी शारदाच आपल्या शरीरात काम करते हे अनुभवी जाणतातच.

साधनेबाबतही दासबोध स्पष्टपणे विवरण करतो. कुठेही शंका नाही. प्रत्यक्ष मुमुक्षुने ग्रंथ पहावा व त्याने साधक बनावे असा सरळ सरळ मामला आहे.

साधक प्रथम 'मी देह आहे' येथून आपली साधना सुरू करतो मग जागृऽती-स्वप्न-सुषुप्ती या अवस्था ओलांडल्या की 'मी ब्रह्म आहे' या (तूर्या) अवस्थेत प्रवेश करतो. तुर्येमध्ये मात्र 'मी' द्रष्टा आहे = मी साक्षी आहे असे भान राहातेच. तेही नाहीसे झाले की मन उन्मन (उन्मनी अवस्था) होते तेव्हा मनाची निर्विकार, निर्मळ ब्रह्माशी तदाकारता साधते - यालाच विज्ञान असे म्हणतात. विज्ञानामध्ये संपूर्ण वृत्तिविरहितपणा असतो. दृष्य असून नसल्यासारखे होते. त्यामध्ये परमात्माच भरलेला अनुभवास येतो. ज्ञानाने अज्ञान नाहीसे होते. देहबुद्धी जाऊन साधकाच्या ठिकाणी आत्मबुद्दी प्रगट होते. अशाप्रकारे ज्ञानाचे पर्यवसान विज्ञानात घडून येते.

वस्तुत: सगुण व निर्गुण यात काहीच फरक नाही हे स्पष्ट करताना समर्थ म्हणतात - गुणरहित ब्रह्म-निर्गुण म्हणजे तेच गुणाधार बनले की सगुण ब्रह्म म्हणावे. एक शांत ब्रह्म म्हणजे निर्गुण तर दुसरे कर्ते ब्रह्म म्हणजेच सगुण ब्रह्म ही एकाच ब्रह्माची दोन दर्शने आहेत. अर्थात श्री समर्थ पूर्णपणे अद्वैतवादी आहेत. यांत ब्रह्मात ओंकाररूपी नित्य शब्द प्रगटतो तेच आदीबीज आहे. म्हणून अनंत गुणांचा भांडार म्हणजेच सगुण ब्रह्म. सत्त्व रज-तम हे गुण नाहीसे होताच 'प्रकृति' उरत नाही. पण गुणमय दृष्य विश्व अंतर्धान पावले तरी ईश्वर आहे तसाच राहातो. कारण तो निर्गुण आहे. विश्वरूप पसरलेला ईश्वर सगुण तर विश्व स्वत:मध्ये लिन करून राहाणारा ईश्वर निर्गुण आहे या फरकातून सगुण निर्गुण हा वाद स्वच्छपणे संपविला गेला.

दृष्यातून माणसाला सुख मिळेल ही कल्पना मिथ्या आहे. फोल आहे. जग म्हणून काहीतरी आहे हे सत्य पण त्यामधून त्या पासून मला पूर्ण सुख मिळेल ही कल्पना असत्य. या दोहोंचे मिश्रण केल्यामुळे जीवन व्यर्थ जाते. जगाचे खरे स्वरूप आपल्याला कळत नाही आणि जे कळते ते त्याचे खरे स्वरूप ठरत नाही, कारण इंद्रिये अंशदर्शी आहेत. ती जगाबद्दल आपल्याला अपुरी माहिती पुरवतात. म्हणून जगाचे यथार्थ स्वरूप कळण्यासाठी अनुभवाची कक्षा बदलावी लागते.

सामान्य माणूस प्रतिमा पूजन करतो - तो अवतार पूजाही करतो पण साधक अंतरात्मा जाणतो; तोच खरा देव कींवा मुळ पुरुष. तो निर्विकार परब्रह्माची पूजा करतो.

जगामध्ये घडणाऱ्या सर्व घटनांचे कर्तेपण अंतरात्म्याकडे आहे तो सर्व काही करतो पण कशासही चिकटत नाही - हाच साधकाचा खरा आदर्श आहे.

अंतरात्म्याला प्रसन्न करून घेण्याचा सोपा मार्ग दासबोधात आढळतो. विश्वमन वश करणे हा तो उपाय. आपणदुसऱ्याचे अंत:करण दुखवू नये, द्वेष करू नये, दुसऱ्याचे वाईट चिंतणे, अहित चिंतणे, सतत वाईट विचार पालवणे हे अंतरात्म्याला दूर लोटल्यासारखेच ठरेल. तसेच कठोर, तीव्र शब्दांत बोलून दुसऱ्याला दु:खी व व्यथित करणे किंवा अपमानित करणे अंतरात्म्याला कधीच आवडत नाही. म्हणून सर्वांशी सलोख्याने वागण्याचा आटोकाट प्रयत्न करून विश्वमन वश करून घ्यावे, त्याच्या मागे भाग्य धावत येते असा दासबोधाचा स्पष्ट निर्णय आहे.

मनाचा गुणधर्म असा की जे खरे आहे असे निसं:देहपणे वाटते त्याला मन विनासायास चिकटतेच. म्हणून विवेकाचा वापर करून दृष्य खोटे आहे हे मनास पटकन देऊन त्याला बळेच परब्रह्माशी गाठ घालावी. यासाठी मनाची दिशा बदलली पाहिजे. यावर विवेक हाच जबरदस्त उपाय आहे. कोणतीही इतर साधना न करता नुसत्या विवेकाच्या बळावर माणूस 'आत्मदर्शन' करून घेऊ शकतो असे श्री समर्थ दासबोधात अभिवचन देतात.

सामान्य माणसात विवेक केव्हा निर्माण होतो तर पूर्वजन्मीच्या पुण्याईने प्रपंचाचे मिथ्यापण पटून, किंवा अनेक प्रकारचे दु:ख, प्रसंग झेलून प्रपंचाला मन जेव्हा विटते, किंवा संतांची संगती, सद्‌ग्रंथ वाचून माणसात विवेक निर्माण होतो.पुढे त्याला सद्‌गुरूच्या कृपेने आत्मसाक्षात्कार होतो. परमार्थसाधना करताना कटाक्षाने पाळावयाच्या दोनच गोष्टी आहेत एक ही की, संशय व अज्ञानाचा त्याग करून सूक्ष्मात शिरणे व दुसरे सूक्ष्मात शिरून तीथेच स्वस्वरूपाचे अनुसंधान साधणे. अनुसंधान टिकविण्यास प्रचंड ताकद लागते व जरा ढीले सोडले तर मन दृष्यांत उतरते. या अवस्थेला साधकावस्था म्हणतात. हे स्वरूपानुसंधान सदा टिकले की सहजस्वभाव झाला की सिद्धावस्था प्राप्त झाली असे समजावे. बाहेरून सिद्ध कदाचित साधकासारखा किंवा सामान्य माणसासारखा दिसणे शक्य आहे पण अंतर्यामी तो पूर्ण स्वरूपाकार झालेला असतो. त्याला आपला 'अक्षय' ठेवा कोणी नेऊ शकत नाही या खात्रीमुळे कमीजास्त घडले तरी राग येत नाही. स्वार्थ पूर्णपणे नाश झाल्यामुळे कधी आशा भंगही होत नाही. त्याचा 'दृष्य खरे' हा भासच नाहीसा झाला, त्यामुळे मानापमान-चिंता-शोकमोह-गर्व-तिरस्कार-दुजेपणा त्याला कसा बाधू शकेल ? तो विवेकाने आत्मस्वरूपी विरल्यामुळे देह प्रारब्धावर टाकतो व निर्भयपणे, निसं:देहपणे मरेपर्यंत जगाच्या कल्याणार्थ खटपट करतो. हीच विदेहावस्था म्हणावी.

दासबोध प्रकर्षाने दोन प्रश्नांची उत्तरे समर्पक देत आहे : (१) मी कोण ? (२) देव कोण ? याचे निसं:देह ज्ञान करून घेणे हेच दासबोधाचे खरे कार्य आहे. जीव व शिव यामध्ये मनाचा पडदा आड येतो तो दूर सारावा. म्हणजे जीव शिवाची भेट आपसुकच घडेल. 'मी देहच आहे मी देहापुरता आहे' ही भावना ईश्वरदर्शनाच्या आड येते. म्हणून आजच्या आपल्या मनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. आपले मन सूक्ष्म, निर्मळ, व्यापक, निर्विशेष व अहंकाररहित बनले तरच त्यामधील अज्ञान क्षीण होऊन ते विश्वमनाशी समरस होईल. म्हणून ईश्वराचे सतत स्मरण करून अंतरिच्या सूक्ष्म जननशक्ती जागृत कराव्यात म्हणजे जीव शिव बनतो. मीच ब्रह्म आहे मीच पूर्ण विश्व व्यापून आहे याची प्रचिती येईल.

दासबोधात परमार्थाचे गुपीत उकळताना श्री समर्थांनी लोकसंग्रहाला तेवढेच महत्त्व प्राप्त करून दिले आहे हे त्यांचे विशेष म्हणावे लागेल. सामाजिक जीवन मूल्ये, सामाजिक संस्था व व्यक्ती यात अंतर्भूत आहेत. 'मी'-'माझ्यासाठी' हा संघर्ष संपला की मी भगवंताचा म्हणून मी लोकांसाठी, हा विचार प्रबळ बनतो. आत्माच फक्त सत्य आहे व अनात्मा सारे असत्य आहे याला सारासार विचार करून आत्मानात्मविवेक जागृती म्हणतात. सत्संग, श्रवण-मनन व निदिध्यास यातून परमार्थ सापडतो त्यासाठी 'दासबोध' हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ समजायला कोणताही संदेह नाही. दृष्याबद्दल अनासक्ती हा विरक्तीचा प्राण - तर ईश्वराच्या सहवासाची प्रेमजन्य तळमळ हा साधनभक्तीचा प्राण समजावा. विवेकाने साधकाला प्रचिती व प्रत्यय याचे स्पष्ट - रोकडे ज्ञान होते. विवेकाचा निर्णय अनुभवाने निश्चित होणे यालाच प्रत्यय किंवा प्रचिती म्हणावे.

## उपासना

परमार्थाची प्रचिती येण्यासाठी उपासना करावी. उपासना ही फार मोठी विद्या आहे. उपासनेचे दोन प्रकार आहेत - (१) बहिरंग, (२) अंतरंग. पूजा, पोथी, पारायणे, भजन, आरती/श्रवण व नामस्मरण इ. उपासनेचे बहिरंग असतात. तर अंतरंग हे मनाची अवस्था बनवितात. ''भगवंता, मी तुझाच आहे, मी खरा कर्ता नाही तू आहेस'', तू माझा मालक, पालक, व चालक ! तुझी इच्छा तीच माझी इच्छा. जीवनाची सर्व सूत्रे सद्गुरूंच्या किंवा एका भगवंताच्या हाती सोपवून आपण कर्तव्यापायी उरणे हे उपासनेचे सर्वश्रेष्ठ अंतरंग दासबोधात उकललेले आढळतात. उपासनेचा खरा अभ्यास अंतरंगात चालतो म्हणून बाहेर धावणारे मन उफराटे करून आंतील वृत्ती आंतच जिरवाव्या लागतात. यांस सद्गुरूंचा पाठींबा जरूर पाहीजे म्हणजे आत्मसाक्षात्कार घडतो.

अतिंद्रिय आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावणे हेच आत्मनिवेदन. सिद्धावस्था प्राप्त करण्यासाठी विवेकाच्या बळावर विरक्ती संपादन करावी, मग सद्गुरूंचे मार्गदर्शन घ्यावे. निदिध्यासाच्या अभ्यासाला म्हणजेच अनुसंधानाला वाहून घ्यावे.

दासबोध स्वच्छपणे असे सांगतो की, आवडीने आणि प्रेमभावनेने भगवंताचे स्मरण राखले तर अंतरात्मा त्वरित प्रसन्न होतो. म्हणून सर्वांचे मनोगत राखण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. जो प्रेमाने-नम्रतेने वागून गोड भाषेने दुसऱ्याचे अंत:करण वश करून येतो त्याच्यावर अंतरात्मा कृपा करतो.


## श्रेष्ठ पुरुष

समाजात खऱ्या अर्थाने निस्पृह, विरक्त, बुद्धीवान व भगवंताच्या निर्मळ प्रेमाने भरलेली व्यक्ती समाजाला तारू शकेल. त्याच्या वास्तव्याने या पृथ्वीवरील दीन दुबळ्यांचे जीवन पुनित होईल. पारमार्थिक वातावरण वाढविण्यासाठी तीर्थक्षेत्राकडे देवाचे उत्सव, सामुदायिक भजन, पूजन, निरुपण, किर्तन, तीर्थयात्रा व महत्त्वाची संतसंगती घडावी. जनसेवा घडतानाच निर्विकल्प उपासना चालू ठेवणारा समर्थांचा महंत हा समाजाच्या सर्व श्रेष्ठ आदर्श पुरुष आहे. तो विवेकी तसाच वैराग्यपूर्ण व निरपेक्ष असतो. तो स्वत: प्रचिती घेतो व दुसऱ्यानाही सांगतो. आसक्तीविरहित प्रेम तो करतो. याचा समाज ऋणी असतो. वेळप्रसंग पाहून तो राजकारणही करतो. पण हे सर्व करताना तो स्वस्वरूप, अनुसंधान यत्किंचितही चुकू देत नाही. तो एकांतही सेवन करतो, तो प्रपंचात ही असतो, परमार्थही उपासतो. अध्यात्म व व्यवहार चोख करतो व उपासना व उपकार यांचा समतोल राखतो. तो फार उपाधि वाढवित नाही परंतु उपाधिविरहितही राहात नाही. तो बहुजन समाजाचे मन राखतो.

आनंदमय ईश्वरी जीवनाची 'दासबोध' ही शाश्वत दिपिका आहे. अखंडपणे वाहणे हा जीवनाचा मूळधर्म आहे. मी देहच आहे या कल्पनेने द्वैत निर्माण होते. अति स्वार्थी व संकोचित मनोवृत्ती व स्पर्धांचा सुकाळ या संघर्षजीवनात स्वस्थता, शांतता व समाधान लोप पावते यावर 'श्रीमत् दासबोध', परमार्थाचे आचरण हा उत्तम उपाय सूचवितो. परमेश्वराचे भान ठेवून त्याच्यासाठी जीवन जगणे खऱ्या देवाला ओळखणे आत्म्याची ओळख करून घेणे - हेच जीवन सार दासबोध आपणास आवर्जुन शिकवितो. प्रपंच व परमार्थ हे दोन नसून एकाच अखंड जीवनाकडे पाहण्याच्या त्या दोन भिन्न दृष्टी आहेत. सारी समस्या मतांचे रूपांतर करून दृष्टी बदलण्याची आहे. द्वैतामुळे जीवनाची सहजता भंग पावते त्यासाठी मीपणा विरून साधनेने शरणागती पत्करावी व सहजसमाधि अनुभवावी हाच दासबोधाच्या रूपाने श्री समर्थांनी जगाला दिव्य संदेश दिला आहे.

# ॥ नवनाथ भक्तिरसामृत ॥

- अशोक मोहिते
बडोदे (गजरात).



— ❖ ❖ ❖ —

*बिलीमोरा येथील नवनाथ आश्रमाचे सानेदादा यांनी लिहिलेला **'नवनाथ भक्तिरसामृत'** हा ग्रंथ गुजराती धार्मिक साहित्य संपदेतील एक मोलाचा ग्रंथ मानला जातो. गुजरातमध्ये नाथ भक्तांमध्ये हा ग्रंथ विशेष लोकप्रिय असून त्याची अनेक पारायणे केली जातात. श्री. अशोक मोहिते यांना हा ग्रंथ कसा भावला त्याची शब्दकथा -*

— ❖ ❖ ❖ —

गुजरातमधील 'बिलीमोरा' नावाच्या एका छोट्या शहरामध्ये 'नवनाथ आश्रम' आहे ते गुजरातबाहेरील फार थोड्या लोकांना ठाऊक असेल. गुजरातमधील नाथ संप्रदायाचे हे पवित्र स्थान आहे. परमपूज्य सद्गुरू श्री सानेदादा हे या आश्रमाचे संस्थापक आहेत. जनकल्याणासाठी त्यांनी या आश्रमाची स्थापना केली आहे. त्यांच्याविषयी स्वतंत्र लेख तयार

करण्याचा मनसुबा आहे. त्यासाठी फक्त साईकृपेची आवश्यकता आहे.

प्रस्तुत लेख त्यांनी लिहिलेल्या 'नवनाथ भक्तिरसामृत' नांवाच्या ग्रंथाविषयी आहे. त्यांनी स्वत: 'नवनाथ भक्तिसार' नांवाच्या मूळ ग्रंथाचे एकशेएक वेळा पारायण केले आहे. त्यानंतर त्यांनी गुरू 'मत्स्येन्द्रनाथ' यांच्या कृपेने व प्रेरणेने गुजराती भाषेमध्ये 'नवनाथ भक्तिरसामृत' हा ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ लिहून त्यांनी गुजराती धार्मिक साहित्य संपदेमध्ये मोलाची भर टाकली आहे. 'नाथ संप्रदाया'चा प्रत्येक भक्त हा ग्रंथ पवित्र मानतो. त्या प्रत्येकाचे तो श्रद्धेचे स्थान आहे. मोठ्या आस्थेने याचे पारायण केल्याने मनोवांछित पूर्ण होते, ती आतां येथील प्रत्येक भाविकाची श्रद्धा झाली आहे. त्यामुळे बहुतेकांच्या संग्रही हा ग्रंथ बघायला मिळतो.

या ग्रंथामध्ये एकूण चाळीस अध्याय आहेत. प्रत्येक संसारी माणसाला नित्य या ग्रंथाचे पारायण करणे कठिण आहे. परंतु पूज्य श्री सानेदादांनी म्हटल्याप्रमाणे या ग्रंथाचा प्रत्येक अध्याय नाथांपैकीच्या कुठल्यातरी एका 'नाथ'द्वारे पुरस्कृत सिद्ध मंत्रसमान आहे. म्हणून ज्याला सगळे अध्यायाचे पारायण शक्य नसेल त्याने एखाद्याअध्यायाचे नित्य श्रद्धेने पारायण करावे. तसे केल्याने उत्तम फळ व नाथकृपा लाभते. प्रत्येक अध्यायाच्या नित्य श्रवण-पठण-मनन व अध्ययनाचे वेगळे फळ मिळते. ज्याला जे फळ हवे असेल त्याने त्याप्रमाणे त्यासाठी अध्यायाची निवड करावी. भाविकांसाठी केवढी ही सोय करून ठेवली आहे.

परंतु मी या ग्रंथाच्या प्रेमात पडलो त्याला कारण मला लहानपणापासून नाथ संप्रदायाविषयी ओढ आहे. आणि माझी अशी समजूत आहे की भारताचा भव्य भूतकाळ, प्राचीन परंपरा व चिरकालापासून चालत आलेल्या प्रणालिंच्यावर नाथ संप्रदायाची जबरदस्त पकड आहे व ती पकड मजबूत असून आजतागायत टिकून आहे. भारताचा हा आदी-अनादि आध्यात्मिक संस्काराचा सनातन प्रवाह नव पल्लवित करण्यात आणि प्रजा-जीवनाच्या अनेक प्रवाहांना परिष्कृत करण्यासाठी नाथ संप्रदायाच्या महान आचार्य आणि योगीयतींचे अद्‌भूत योगदान आहे, ते सर्वश्रुत आहे.

महाराष्ट्रामध्ये नाथ संप्रदायाविषयी बरेच साहित्य उपलब्ध आहे. या साहित्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी संतश्री ज्ञानेश्वर, निवृत्ति व विदुषी मुक्ताबाई यांचा फार मोठा हातभार लागला आहे. स्वत:चे जीवन कृतार्थ करू पाहणाऱ्या भक्तीमार्गियांना श्री सद्‌गुरूंची मुखवाणी - भगवद्‌दर्शन आणि भक्तिमहिमा गाणारे ग्रंथ अमूल्य व प्रसादतुल्य वाटत असतात. 'श्री नवनाथ भक्तिसार' हा मूळ ग्रंथ असाच एक अनमोल ग्रंथ आहे. हा ग्रंथ १७४१च्या संवत्सरी ज्येष्ठ सुद-पाडवा या दिवशी 'मालु' कवींनी सामान्य जनसमुदायाला सुख-शांती तसेच मनोकामना पूर्ण करण्यासाठी गुरू दत्तात्रय आणि श्री नवनाथ प्रार्थनासहीत प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाचे चाळीस अध्याय असून त्यात एकंदर ७६०० ओव्या आहेत. 'श्रीमद् भागवत' या अद्‌भूत ग्रंथाच्या अकराव्या अध्यायाच्या आधारे, परमकृपाळू परमेश्वराच्या शुभआशीर्वचनाने आणि प्रेरणेने 'श्री नवनाथ भक्तिसार' या ग्रंथाची निर्मिती झाली अशी नाथ संप्रदायींची दृढ मान्यता आहे.

कलियुगाच्या प्रारंभकाळी श्री नरनारायणाने नऊ नारायण (कवि नारायण, हरि नारायण, अंतरिक्ष नारायण, प्रबुद्ध नारायण, पिप्पलायन नारायण, अर्विहोत्र नारायण, दुमिल नारायण, चमस नारायण, करभाजन नारायण) यांना बोलावून सांगितले की, कलियुगाच्या प्रारंभामुळे पृथ्वीवर हाहाकार माजला असून पृथ्वीवासी आधी-व्याधी-उपाधी यांच्या फेऱ्यात सापडून त्यांना कष्टप्रद जीवन कंठावे लागते आहे. त्यामुळे पृथ्वीवासीयांच्या रक्षणासाठी त्यांना संकटमुक्त करण्यासाठी व त्यांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांपासून सोडविण्यासाठी आपल्या सर्वांना पृथ्वीवर अवतार स्वरूपाने प्रगट होण्याची वेळ समीप आली आहे. तेव्हा आपण सर्वजण पृथ्वीवर प्रयाण करू या.... वगैरे....

विष्णू देवाच्या आज्ञेने कवी-नारायणाने 'मत्स्येन्द्र' नांव धारण करून पृथ्वीवर विचरण केले. दुसरे हरि नारायण गोबर (शेणखता)च्या उकिरड्यातून निर्माण झाले म्हणून त्यांनी स्वत: 'गोरक्ष' हे नांव धारण केले. अंतरिक्ष नारायणाने 'जालंधर' हे नांव अंगीकारीले आणि प्रबुद्ध नारायण 'कानिफा' हे नांव स्वीकारून प्रजेसमक्ष आले. तसेच पिप्पलायन नारायण हे 'चरपटीनाथ' झाले आणि अर्विहोत्र नारायण हे 'नागेश' या नांवाने प्रसिद्ध झाले. दुमिल नारायणाने स्वत: 'भरतनाथ' हे नांव धारण केले. अन् चमस नारायण हे 'रेवणनाथ' म्हणून ओळखले गेले. त्याचप्रमाणे शेवटचे करभाजण नारायण यांनी 'गहनीनाथ' हे नांव स्वीकारले. अशातऱ्हेने कलियुगात भक्तिमार्गाला परिपुष्ट करण्यासाठी नऊ नारायणांनी 'नवनाथ' म्हणून पृथ्वीवर आगमन केले. आदिगुरू श्री शंकर यांच्या शुभाशिषपुरस्कृत अशा या नाथ संप्रदायाची परंपरा गुरू श्री दत्तात्रयांपासून सुरू झाली असून ती आजपर्यंत अनेक महान तेजस्वी आणि सामर्थ्यवान योगी-मुनींद्वारे अलंकृत झाली आहे.

नवनाथांची उत्पत्ती, त्यांच्या जनकल्याणार्थ विविध लीला आणि समाधि अवस्थेकडे प्रयाण करणाऱ्या अनेक कथांचे संकलन प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. असे पूज्य श्री सानेदादांनी प्रस्तावनेत म्हटले आहे. या ग्रंथाचा प्रत्येक अध्याय ही स्वतंत्र कथा आहे. अनेक कथांमधून शेवटपर्यंत सर्व कथा-प्रसंगांची एकसूत्रता टिकवून ठेवण्यात आली आहे. ही

कुशलता ध्यानात आल्यावाचून रहात नाही. कथा-प्रसंगांची उत्कृष्ट मांडणी व उत्तम भाषाशैली लाभल्यामुळे हा ग्रंथ वाचनीय झाला असून शेवटपर्यंत वाचकांची उत्कंठा टिकवून ठेवण्याचे त्यात सामर्थ्य आहे. वाचक 'नवनाथा'च्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन मंत्रमुग्ध होतो. हे वेगळे सांगायला नको. 'शाबरी मंत्र कवित्व शक्ति'साठी अनेक देवतांकडून त्यांची सिद्धि व सामर्थ्य मिळविण्यासाठी श्री मत्स्येन्द्रनाथांनी कशी बुद्धीपूर्वक समयसूचकता दाखविली त्या प्रसंगांची रसभरीत वर्णने वाचून देहभान हरपते. तसेच श्री गोरक्षनाथांची गुरुभक्ती व इतर नाथांनी योग सामर्थ्याच्या बळावर केलेली जनहितार्थ कार्ये, यांचा वृत्तांत कथास्वरूपात वाचतांना 'नवनाथां'विषयी भक्तिभावाने मन पुलकित होते.

(१) प्रथम अध्यायामध्ये सुरूवातीला गणपतिस्तवन तसेच श्री मत्स्येन्द्रनाथ यांचा जन्मवृत्तांत आणि बद्रिकाश्रमामधील त्यांचे तपानुष्ठान आले आहे. या अध्यायाचे नित्य श्रवण-पठण केल्याने स्वगृहातील भूत-प्रेतबाधा नष्ट होते.

(२) दुसऱ्या अध्यायामध्ये गुरू दत्तात्रयांनी श्री मत्स्येन्द्र यांना गुरुमंत्र दिला आणि नागाश्वत्थधामी जाऊन सर्व सिद्धि संपादित करविल्या ह्या प्रसंगाचे वर्णन आले आहे. या अध्यायाच्या नित्य श्रवण-पठणाने अपार धनप्राप्ती होऊन दारिद्रय टळते.

(३) तिसऱ्या अध्यायामध्ये मारुति विरुद्ध प्रथम युद्ध आणि नंतर मिलन तसेच त्यांच्या ऐक्याविषयी वर्णन आले आहे. या अध्यायाच्या नित्य श्रवण-पठणाने शत्रूंचा नाश होतो. कुणी मूठ मारली असेल तर असर होत नाही व मारुति सदा प्रसन्न राहून स्वगृही मारुतिचा वास राहतो.

(४) चौथ्या अध्यायामध्ये श्री मत्स्येन्द्रद्वारे अष्टभैरव आणि चामुंडा यांच्या पराजयाचे वर्णन आले आहे. याचे नित्य श्रवण-पठण केल्याने छल-कपटाच्या बंधनांतून मुक्ति मिळते. शत्रूंचा पराभव होतो आणि चिरंतन शांति लाभते.

(५) पाचव्या अध्यायामध्ये मत्स्येन्द्रद्वारे सर्व भूत-पिशाच यांचे वशीकरण आले आहे. याचे श्रवण-पठण केल्याने भूत-प्रेत-पिशाच यांच्यापासून स्वतःची सुटका होऊ शकते.

(६) सहाव्या अध्यायामध्ये मत्स्येन्द्र-कालिका यांचे युद्ध. कालिकेपासून त्यांना शिव-अस्त्र प्राप्त हा वृत्तांत आला आहे. याच्या श्रवण-पठणाने शत्रू वश होतात.

(७) सातव्या अध्यायामध्ये वीरभद्राला पराजित करून त्याच्याबरोबर समजूती हा भाग आला असून याच्या श्रवण-पठणाने चौऱ्यांशी योनींची व्यथा नाश पावते. चिंता-व्यग्रता नष्ट होते.

(८) आठव्या अध्यायामध्ये श्रीरामाला भेटून पाशुपत धन्य झाले. हा वृत्तांत आला असून याचे श्रवण-पठण केल्याने बऱ्याच दिवसापासून दूर राहिलेल्या स्वकीयांचे मिलन व संपूर्ण विद्या-ज्ञान लाभते.

(९) नवव्या अध्यायामध्ये गोरक्ष यांचा जन्मवृत्तांत आणि विद्या-कला प्राप्त यांचे वर्णन आले आहे. याचे श्रवण-पठणाने ज्ञानवृद्धी होते व विद्या-संपन्नता लाभते.

(१०) दहाव्या अध्यायामध्ये गोरक्षविद्या सिद्धि-गहिनी जन्मवृत्तांत आला आहे. याचे श्रवण-पठणाने स्त्रीदोष दूर होतो. पुत्र-लाभ होतो.

(११) अकराव्या अध्यायामध्ये 'स्त्री'राज्यात मत्स्येन्द्रचे आगमन तसेच जालंधर-अग्निदेवाचे मिलन आले आहे. याचे श्रवण-पठणाने श्री मत्स्येन्द्रनाथांची कृपा होते. अग्निचे भय रहात नाही व गृहदोष निवारण होते.

(१२) बाराव्या अध्यायामध्ये जालंधरशिष्य कानिफा यांच्या विषयीचा वृत्तांत आला असून त्याच्या श्रवण-पठणाने सर्व देवतांकडून कष्ट निवारण होते.

(१३) तेराव्या अध्यायामध्ये मैनावती जालंधरकृपाप्राप्त या विषयीचा वृत्तांत आला आहे. याचे श्रवण-पठण केल्याने मत्स्येन्द्रनाथांच्या कृपेने स्त्रीहत्या पाप नष्ट होते.

(१४) चौदाव्या अध्यायामध्ये गोपीचंदाने जालंधराला विहिरीत ढकलले हा कथाभाग आला आहे. याच्या श्रवण-पठणाने जालंधराची कृपादृष्टी होते. आरोप-आक्षेपातून मुक्ति मिळते.

(१५) पंधराव्या अध्यायामध्ये गोरक्ष आणि कानिफा यांचेकडून गुरूचा शोध घेणे व त्यांचे त्यासाठीचे परिभ्रमण याविषयी वृत्तांत आला आहे. त्याचे श्रवण-पठण केल्याने घरातील कलह दूर होऊन प्रेमभाव वाढतो आणि कानिफनाथांकडून कल्याण होते.

(१६) सोळाव्या अध्यायामध्ये गोरक्ष-कानिफा यांचे त्यांच्या गुरूंशी मिलन हा कथाभाग आला आहे. त्याच्या श्रवण-पठणाने अशुभ स्वप्नदोषाचे निवारण होते व संकटातून कानिफ-नाथांकडून रक्षण मिळते. तसेच सद्‌गुरुकृपा लाभते.

(१७) सतराव्या अध्यायामध्ये गोपीचंदाकडून नाथ-संप्रदायाचा स्वीकार हा कथाभाग आला आहे. याच्या श्रवण-पठणाने दुर्बुद्धीचा नाश होऊन मोहबंधन तुटते व योगसिद्धि लाभते.

(१८) अठराव्या अध्यायामध्ये गोपीचंदाच्या तपप्रभावाने

चंपावती सजीव होते, हा कथाभाग आला आहे. त्याच्या श्रवण-पठणाने ब्रह्महत्या दोष नष्ट होतो व श्रद्धाभाव दृढ होतो.

(१९) एकोणीसाव्या अध्यायामध्ये 'स्त्री'राज्यात गोरक्षनाथांचा प्रवेश याविषयीचा कथाभाग आला असून त्याच्या श्रवण-पठणाने मोक्षाचा मार्ग मिळतो. मोह-माया दूर होते.

(२०) विसाव्या अध्यायामध्ये 'स्त्री'राज्यात मत्स्यैन्द्र-गोरक्ष यांचे मिलन. हा कथाभाग आला आहे. त्याचे श्रवण-पठण केल्याने विस्मृति दूर होते. स्मृति सतेज बनते.

(२१) एकविसाव्या अध्यायामध्ये 'स्त्री'राज्यातून मत्स्येन्द्र यांचे बाहेर पडणे. हा वृत्तांत आला आहे. याचे श्रवण-पठण केल्याने गोहत्या दोष निवारण होते.

(२२) बावीसाव्या अध्यायामध्ये मत्स्येन्द्र आणि मैनावती यांच्या मुलाकात विषयी वृत्तांत आला आहे. त्याच्या श्रवण-पठणाने विद्वान सुपुत्राची प्राप्ती होते.

(२३) तेवीसाव्या अध्यायामध्ये गर्भगिरिच्या विशाल भांडाराची झलक दाखविली आहे. याच्या श्रवण-पठणाने स्वगृही अखंड समृद्धीचा वास राहतो.

(२४) चोवीसाव्या अध्यायामध्ये भर्तृहरी अवतार चरित्रकथा आली आहे. त्याच्या श्रवण-पठणाने ब्रह्महत्या दोष नष्ट होतो.

(२५) पंचविसाव्या अध्यायामध्ये चित्रया-सुरोचन गांधर्व शापमुक्त हा कथाभाग आला असून त्याचे श्रवण-पठणाने सदैव मानव योनी प्राप्त होते.

(२६) सव्विसाव्या अध्यायामध्ये विक्रम-भर्तृहरि यांचे उज्जैन येथे मिलन हा कथाभाग आला आहे. याचे श्रवण-पठणाने शत्रूंचा नाश होतो व गोहत्या दोष नष्ट होतो.

(२७) सत्ताविसाव्या अध्यायामध्ये विक्रम-भर्तृहरि यांना राज्यपदाची प्राप्ति याविषयीचा कथाभाग आला असून त्याच्या श्रवण-पठणाने इच्छित वस्तु प्राप्त होते.

(२८) अठ्ठाविसाव्या अध्यायामध्ये पिंगळाच्या वियोगाने भर्तृहरि शोकमग्न हा वृत्तांत आला आहे त्याचे श्रवण-पठणाने विवाहेच्छुकांना मनपसंत जोडीदार मिळतो.

(२९) एकोणतिसाव्या अध्यायामध्ये भर्तृहरि नाथपंथी झाले. हा कथाभाग आहे. याच्या श्रवण-पठणाने त्रिविध तापाचे शमन होते.

(३०) तिसाव्या अध्यायामध्ये शिव तेजोद्‌भव कृपणागार चरित्र हा कथाभाग आला आहे. त्याचे श्रवण-पठणाने दुर्बुद्धी टळून सद्‌बुद्धी प्राप्त होते.

(३१) एकतिसाव्या अध्यायामध्ये कृष्णागार चौरंगीचे तपोवृत्त आले आहे. याचे श्रवण-पठणाने कपट-कारस्थानाचा असर होत नाही.

(३२) बत्तीसाव्या अध्यायामध्ये त्रिविक्रमाच्या देहामध्ये मत्स्येन्द्राच्या आत्म्याचे आवर्तन याविषयीचा कथाभाग असून त्याच्या श्रवण-पठणाने प्राणसंकट दूर होते.

(३३) तेतीसाव्या अध्यायामध्ये सिद्ध चौरंगी अडबंग तपोवृत्त आले आहे. त्याच्या श्रवण-पठणाने धनुर्वात दूर होतो. वायुदोष नष्ट होतो.

(३४) चौतीसाव्या अध्यायामध्ये मत्स्येन्द्र देहागमन-रेवण वृत्तांत आला असून त्याचे नित्य श्रवण-पठणाने सर्व कार्यात यश प्राप्त होते.

(३५) पस्तीसाव्या अध्यायामध्ये दत्तकृपेने रेवणनाथ सिद्ध झाले ही कथा आली आहे. त्याच्या नित्य श्रवण-पठणाने बेचाळीस कुळांचा तारणहार पुत्र जन्मतो.

(३६) छत्तीसाव्या अध्यायामध्ये रेवण-नागनाथ सामर्थ्यवृत्त आले असून त्याचे श्रवण-पठण केल्याने सर्व विषबाधा नष्ट होते.

(३७) सदतीसाव्या अध्यायामध्ये वटसिद्ध नागनाथ-मत्स्येन्द्र मिलनाचा कथाभाग आला आहे. त्याचे श्रवण-पठणाने सर्व दोष नाश पावतात.

(३८) अडतीसाव्या अध्यायामध्ये चरपट जन्मयोगसिद्धि वृत्तांत आला असून त्याच्या श्रवण पठणाने ज्वरपीडा तसेच गरमीचे रोग नाश पावतात.

(३९) एकोणचाळीसाव्या अध्यायामध्ये चरपटीनाथ यांचा देवतांवर विजय हा कथाभाग असून त्याचे श्रवण-पठण केल्याने समरांगणांत विजय प्राप्त होतो.

(४०) चाळीसाव्या अध्यायामध्ये इंद्राद्वारे सोमयज्ञाचे आयोजन हा वृत्तांत आला असून त्याच्या नित्य श्रवण-पठण व अध्ययनाने इच्छित फळ प्राप्ति अवश्य होते.

गोरक्षवाणी असे म्हणते की, निंदेचा त्याग करून विश्वास आणि श्रद्धापूर्वक या ग्रंथाचे श्रवण-पठण करणाऱ्याला व हा ग्रंथ संग्रही बाळगणाऱ्याला पावलो-पावली 'नवनाथां'ची कृपा-प्रसादी आणि आध्यात्मिक चमत्कृतिंचा लाभ मिळतो.

हा अनुभव सर्वांना मिळाही हीच अपेक्षा !....

# ज्ञानदेवांचे परम अर्थ कथन :
# अनुभवामृत

- डॉ. ग. वा. तगारे, सांगली.

— ❖ ❖ ❖ —

*ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी अवघ्या विश्वालावंदनीय ठरलेली आहे. तसाच त्यांनी लिहिलेला 'अनुभवामृत' ग्रंथ त्यांच्या प्रज्ञा-प्रतिभा व प्रसाद यांचा एक उत्कट आविष्कार आहे. पारमार्थिक ग्रंथ म्हणजे परम अर्थ सांगणारा, या दृष्टिने अनुभवामृत खऱ्या अर्थी पारमार्थिक ग्रंथ कसा आहे, याविषयी थोडक्यात खूप काही सांगणारा लेख -*

— ❖ ❖ ❖ —

'पारमार्थिक' म्हणजे 'परमार्थ-विषयक' आपण धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार अर्थ - पुरुषार्थ मानतो. त्यापैकी 'मोक्ष' हा 'परम' म्हणजे श्रेष्ठ 'अर्थ', 'पुरुषार्थ' मानला आहे. जो ग्रंथ किंवा काव्य 'मोक्षमार्ग'विषयी चर्चा, मार्गदर्शन करीत असेल त्यालाच 'पारमार्थिक' म्हणावयाचे.

मी गेली ५० वर्षे संस्कृत, पाली, प्राकृत, इंग्लिश, मराठी इ. भाषातील 'पारमार्थिक' पुस्तके वाचत आलो आहे. पण ज्याच्यामुळे विश्वमय आनंदसोहळा प्रत्यायास येईल.

**सणु भोगिजे सणें। विश्वाचे नि।**

असे अभिवचन देणारे एकच पारमार्थिक काव्य आढळले. ते म्हणजे ज्ञानदेव विरचित **'अनुभवामृत'**

## अनुभवामृत-काव्य

जे रसात्मक असेल ते काव्य : **'रसात्मकं काव्यम्'**. काव्यात रसाला महत्त्व असण्याचे कारण 'रस हा ईश्वरस्वरूप आहे' **'रसो वै सः।'** अशी आमची परंपरागत श्रद्धा आहे. तो रस श्रृंगार, वीर, करूण.... शान्त असा कोणताही असो. पण रसहीन काव्य 'काव्य' नामाला अपात्र आहे.

पण काव्य म्हटल्यावर त्यात रसांचा राजा श्रृंगाररस असलाच पाहिजे हे आपण गृहीत धरतो. तेव्हां काव्य या पदवीस पात्र होण्यासारखा श्रृंगार - अनुभवामृतात आहे का ? होय. पुढील स्त्रीपुरुष संभोगाचे वर्णन पाहा.

१. ती दोघे आपल्या शरीरांची आटणी करून एकत्व साधतात. ती दोनपणा (आपल्यातील विभक्तपणा) भासू देत नाहीत.

२. ज्यांना आपल्या स्वसुखाची इतकी गोडी आहे की ते दोनपण मिळून एकपणच असते आणि त्यांचे एकपण गमतीदाखलसुद्धा फुटत नाही.

३. ती आपल्या प्रियकराचे शरीर आहे आणि तिचा प्रियकर तिच्या शरीराचे भूषण आहे. आणि हे दोघेजण आपले भिन्नपण एकत्र कालवून जेवतात (उपभोग घेतात.)

हा भावार्थ - हे दांपत्यक्रीडेचे वर्णन पुढील ओव्यांचे अर्वाचीन रूपांतर आहे. त्या ओव्या अशा :-

(ओवीक्रम डॉ. वा. दा. गोखले संपादित पाठशुद्ध (critical) आवृत्तीतील संहिता)

**१६. दोहीं आंगाचिया आटणी।**
**जियें गिवसित आहाती येकपणीं।**
**आणि भेदाची वाहाणी।**
**आधाधी जिये॥**

**५. कैसी स्वसुखिंचि आळुकी।**
**जी दोनिपण मिळौनि येकी।**
**नेदितिच कवतिकीं।**
**येकपणा फुटों॥**

**४०. जिया प्रीयाचें जें आंग।**
**जो प्रीयु प्रियेचे चांग।**
**जिये कालौनि दोनि भाग।**
**जेविती आहाती॥**

अशी खुल्या भाषेतील दांपत्यक्रीडा अमृतानुभवाच्या पहिल्या १-६४ ओव्यांत आहे. ती वाचून मधुराभक्तीचे पुरस्कर्ते संत गुलाबराव महाराज इतके मोहून गेले की त्या चौसष्ट ओव्यावर